SHIV VANI
# शिव वाणी
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521
L/130/RNP/Renewal/2025-2026

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी
संपादक : वैभव विवेक स्वामी

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक ०९ | सोमवार दि.०२ मार्च २०२६ | RNI- MAHMAR2003/14666 | पाने : ४ | किंमत ०३ ₹

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -09 | MONDAY DT.02 MARCH 2026 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 03 RUPEES

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# मध्य पूर्वेत परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण

## इराण, दुबईसह अन्य देशांमध्ये लाखो अडकले सुरक्षित मायदेशात आणण्याची कशी तयारी ?



तेहरान : अण्वस्त्रनिर्मिती रोखण्यासाठी करार करण्याकरिता चर्चेच्या तीन फे-या अपयशी ठरल्यानंतर अमेरिका आणि इस्रायलने शनिवारी इराणवर जोरदार हल्ले चढविले. या हल्ल्यात इराणमध्ये २०० पेक्षा अधिक जण ठार झाले. दक्षिण इराणमध्ये मिनाब येथे शाळेला लक्ष्य करण्यात आले, यात ८५ विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. या हल्ल्यांना प्रत्युत्तर देत इराणने इस्रायलसह आठ देशांवर प्रतिहल्ले केले. यामुळे अनेक ठिकाणची विमानसेवा बंद करण्यात आली असून, शेकडो भारतीय अडकल्याची माहिती मिळाली आहे.

सामाजिक समस्यांवरील चर्चासत्रे

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर मध्य पूर्वेतील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली आहे. अद्यापही हल्ले सुरूच आहेत. अनेक देशांनी हाय अलर्ट जारी केला आहे. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अनेक मध्य पूर्वेतील देशांमधील भारतीय दूतावासांनी त्यांच्या नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, जॉर्डन, बहरीन,

### भारतीय नागरिकांना सूचना

अबू धाबीमधील भारतीय दूतावासाने युएईमध्ये राहणा-या भारतीयांना सतर्क राहण्याचे आणि गर्दीच्या ठिकाणी न जाण्याचे आवाहन केले आहे. रियाधमधील भारतीय दूतावासाने सौदी अरेबियातील भारतीयांना स्थानिक सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचा आणि अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे. बहरीन आणि पॅलेस्टाईनमधील भारतीय दूतावासांनीही सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन करण्याचे आणि आपत्कालीन परिस्थितीत हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### एअर इंडिया, इंडिगोची विमाने रद्द

तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय विमान कंपन्यांनीही खबरदारीचे उपाय केले आहेत. एअर इंडियाने मध्य पूर्वेला जाणारी अनेक उड्डाणे रद्द केली आहेत. दिल्लीहून तेल अवीवला जाणा-या एअर इंडियाच्या विमानाला परत बोलावण्यात आले. इंडिगोने इराणच्या हवाई हद्दीतून जाणारी आंतरराष्ट्रीय उड्डाणे तात्पुरती स्थगित केली आहेत. एअर इंडिया एक्स्प्रेसने पश्चिमेकडे जाणारी आंतरराष्ट्रीय उड्डाणे स्थगित केली आहेत.

# रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ थाटात संपन्न

## सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

बीड : प्रतिनिधी

सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रातील व्यक्तींना प्रेरणा देऊन त्यांचा उत्साह वाढविण्याच्या उद्देशाने रयत सामाजिक प्रतिष्ठानचा सोळावा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भव्य आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.हा सोहळा प्रतिष्ठानच्या रोहिणीताई गणेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुलोचना माने व शुभांगी माने यांनी केले होते.

कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरली ती प्रमुख उपस्थिती राजेश दादा खर्डे (वेसावकर) यांची पारंपरिक कोळी वेशातील दमदार एन्ट्री. तसेच प्रतिष्ठान अध्यक्षा द्रौपताबाई पठारे, ज्येष्ठ समाजसेवक कैलास दादा पठारे, विठ्ठल मूर्तीवार, मंजू ताई पठारे, अक्षय कलाकार, बंडोपंत सोळुंके, चित्रपट मंडळाचे प्रशांत होर्शीळ सर,




## रस्ता सुरक्षा अभियान २०२६ : जिल्हा वाहतूक शाखेच्या उत्कृष्ट कार्याचा सन्मान

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेने दि. ०१ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान रस्ता सुरक्षा अभियान २०२६ प्रभावीपणे राबविले.

या अभियानांतर्गत जिल्हा वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी पुढाकार घेत वाहनधारकांसाठी विशेष वाहतूक नियम प्रबोधन शिबिराचे आयोजन केले. रस्ता सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन व अपघात प्रतिबंध याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

हे अभियान उत्कृष्टरीत्या राबविल्याबद्दल अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार आजिनाथ मुंडे व सखाराम घोलप यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यात रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती वाढविण्यासाठी वाहतूक शाखेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम पत्रकारांनी करावे - केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

## वाशीम येथे पत्रकार संघाचे २७ वे राज्यस्तरीय अधिवेशन थाटात संपन्न





वाशिम /प्रतिनिधी

समाजात घडणाऱ्या घटना व मुद्द्यांवर सत्य आणि निसपक्ष दृष्टिकोन ठेवून पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे .पत्रकार हा समाज आणि शासन यांच्यामधील संवाद साधणारा महत्त्वपूर्ण दुवा आहे. पत्रकारांनी शासनाच्या प्रत्येक कामकाजावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे .समाजाला जागृत करणे चांगल्या गोष्टीला प्रोत्साहन देणे ही भूमिका त्यांनी कायम ठेवावी. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम पत्रकारांनी करावे असे आव्हान केंद्रीय आयुष मंत्री नामदार प्रतापराव जाधव यांनी केले.

### निलेश सोमानी यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर

पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष या राज्यस्तरीय अधिवेशनाचे मुख्य आयोजक निलेश सोमानी यांना पत्रकार संघाचे संस्थापक संघटक संजय भोकरे साहेब यांच्या आदेशानुसार राज्याचे सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी नूतन प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी जाहीर करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर यासंदर्भात लवकरच प्रदेश संघटक भोकरे साहेबांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय कोर कमिटीची बैठक होऊन या बैठकीमध्ये निलेश सोमानी यांना अधिकृतरित्या प्रदेशाध्यक्ष पदाचा पदभार दिला जाईल असे जाहीर करून विविध मागण्यांचे ठराव पारित केले.

### वैभव स्वामी राज्यस्तरीय उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासहित किशोर रायसाकडा, नयन मोंढे, राकेश खराडे, शंकर बोरघरे, अनुप भार्गव, गणेश देगावकर, नागेश आदापुरे, दशरथ चव्हाण, पोपटराव गव्हांदे, राजेंद्र शिंदे यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट संघटक म्हणून नवचेतना पुरस्कार तर पत्रकार भारती सोमाणी व वृषाली टेकाळे यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## संपादकीय....

# आर्थिक विश्वासार्हतेचा पाया

मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.

मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षासाठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे.

# चिमुकल्यांचा विज्ञान मेळावा ठरला यशस्वी, ९७ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## यूनिक क्युरियस किड्स स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न




परळी /प्रतिनिधी

यूनिक क्युरियस किड्स स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्य विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात शाळेतील तब्बल ९७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध विषयांवर आकर्षक आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध बक्षिसेही पटकावली.

विशेष म्हणजे, लहानग्या चिमुकल्यांनी आपल्या प्रकल्पांचे स्पष्ट, आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी स्पष्टीकरण देत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीने आणि सादरीकरण कौशल्याने उपस्थित पालक आश्चर्यचकित झाले व अभिमानाने भारावून गेले.

या कार्यक्रमासाठी परीक्षक व प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका डॉ. पूजा तोतला मॅडम, सौ. रुची ठक्कर मॅडम आणि सौ. आकांक्षा सेठिया मॅडम व सौ. शीतल पंपालिया मैडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेच्या संचालिका सौ. पूजा सारडा मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंदांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

हा विज्ञान मेळावा केवळ प्रदर्शन न राहता, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा आणि त्यांच्या जिज्ञासेला नवी दिशा देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.



# युवकांच्या सहभागातूनच शाश्वत विकास साध्य होईल – डॉ. शिवप्रसाद डोंगरे

जयक्रांती महाविद्यालयाच्या रासेयो विशेष शिबिराचा समारोप समारंभ संपन्न

लातूर ।प्रतिनिधी

येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागामार्फत आयोजित विशेष वार्षिक शिबिर मौजे जमालपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. 'शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास' या संकल्पनेवर आधारित हे सात दिवसीय नुकतेच संपन्न झाले.

या शिबिराच्या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बालाजी घार, प्रमुख पाहुणे डॉ. शिवप्रसाद डोंगरे, मंचावर प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, डॉ. संगीता घार, मुख्याध्यापक श्री. नागनाथ कारंडे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. रामेश्वर स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.




# आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे महिनाभर मधुमेह रुग्णांची रक्त व लघवी मोफत तपासणी

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रसंतांच्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त आनंद ऋषीजी हॉस्पिटल येथे मार्च महिनाभर मोफत मधुमेह (साखर) तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. सामाजिक बांधिलकी जपत 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर सेवा देणाऱ्या या रुग्णालयात बीड शहर व परिसरातील नागरिकांसाठी हा विशेष आरोग्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. वेळेवर तपासणी न केल्यास हृदयविकार, मूत्रपिंड विकार, डोळ्यांचे आजार यांसारख्या गंभीर गुंतागुंती उद्भवू शकतात. त्यामुळे जनजागृती व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा या उद्देशाने हे मोफत शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत पुढील तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत : रक्तातील जेवणाअगोदरची साखर जेवणानंतरची साखर रँडम शुगर तपासणी तपासणीसोबत मोफत वैद्यकीय मार्गदर्शनही दिले जाणार असून बीडमधील सुप्रसिद्ध डॉ. राजेश पारिख रुग्णांना योग्य आहार, व्यायाम व जीवनशैलीविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

तपासणीची वेळ : दररोज सकाळी ७ ते संध्याकाळी ७

स्थळ : आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेच्या बाजूला, बीड या स्तुत्य उपक्रमाचा लाभ बीड शहर व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन सकल जैन समाज, बीड व जैन सोशल फेडरेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भारतीय नागरिकांसाठी सुरक्षा ॲडव्हायझरी जारी

मुंबई ।प्रतिनिधी

मध्यपूर्व व परिसरातील काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या संबंधित दूतावासांनी तेथे वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांसाठी सुरक्षा डव्हायझरी जारी केली आहे.

या अनुषंगाने पॅलेस्टाईन (रामल्ला), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद) कुवैत, बाहरीन, मस्कत, जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी सतर्क राहावे, अनावश्यक हालचाल टाळावी आणि स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशातील भारतीय दूतावासांच्या २४७ हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधावा. दूतावास नियमितपणे परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक सूचना जारी करत आहेत.महाराष्ट्र शासनाच्या वतीने परदेशातील महाराष्ट्रातील नागरिकांनी शांतता व संयम राखावा, अधिकृत सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक असल्यास तात्काळ भारतीय दूतावासाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत सतर्क असून केंद्र शासन व संबंधित दूतासांशी समन्वय ठेवून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

# काझी मुहिबुर्रहमान मुशाहेद यांचा पहिला रोजा उत्साहात पूर्ण

बीड (वार्ताहर):दिनांक १ मार्च, रविवार रोजी पवित्र रमजान महिन्यात काझी मुहिबुर्रहमान मुशाहेद यांनी वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) अत्यंत श्रद्धा, संयम आणि उत्साहाने पूर्ण केला. लहान वयातच धार्मिक कर्तव्याची जाणीव ठेवून त्यांनी रोजा पूर्ण केल्याने कुटुंबीय व नातेवाईकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मुहिबुर्रहमान हे हाजी काझी अजिजोद्दीन (धोंडराईकर), निवृत्त पोस्टमॅन यांचे नातू तसेच काझी मुशाहेद अजिज, जिल्हाध्यक्ष - अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना, बीड यांचे सुपुत्र आहेत. त्यांच्या या धार्मिक व प्रेरणादायी कृतीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

या प्रसंगी त्यांचे ताया बाबा काझी अक्रमोद्दीन (महाराष्ट्र ऑप्टिकल्स, गेवराई), चाचा जान काझी वझीरोद्दीन (चडठढउ, बीड) तसेच चाचु काझी शाहेद (महाराष्ट्र ऑप्टिकल्स, बीड) यांनी विशेष अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले. नातेवाईक व मित्रपरिवाराकडूनही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

लहान वयातच धार्मिक संस्कार जोपासत मुहिबुर्रहमान यांनी दाखवलेला हा आदर्श इतर बालकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# लक्ष्मण आण्णा व बाळराजे पवार यांच्याकडून ८ मार्च रोजी इफ्तार पार्टीचे आयोजन

गेवराई - मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान महिन्यात पवित्र रोजगार मुस्लिम बांधवांसाठी शहरातील पवार कुटुंबाच्या वतिने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बाळराजे दादा पवार व मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्याकडून रोजा इफ्तारीचे आयोजन भगवती टॉकीज जवळ दि.८ मार्च रोजी आयोजित करण्यात आले आहे तसेच मगरीब नमाज का इंतजाम किया गया हैं असे आवाहन करण्यात आले आहे तरी सर्व मुस्लिम बांधवांनी इफ्तारीसाठी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे

रमजान महिन्यातील तमाम रोजगार मुस्लिम बांधवांसाठी प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी शहरातील पवार कुटुबाच्या वतिने मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार व बाळराजे दादा पवार यांच्या कडुन रोजा इफ्तारीचे आयोजन दि.८ मार्च रविवारी रोजी भगवती टॉकीज जवळ रोजागार

मुस्लिम बांधवांसाठी इफ्तारीचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व मुस्लिम बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन पवार कुटुंबाच्या वतिने करण्यात आले आहे

## पान १ वरून...

**रयत सामाजिक प्रतिष्ठानचा..**

समाजसेवक सुशीलजी खटोड, एम.एस. कन्स्ट्रक्शनचे संचालक साथीराम अण्णा ढोले, ओबीसी फाउंडेशनचे लक्ष्मण लटपटे, अहिल्यानगर येथील संतोष अवताडे, तसेच सोशल मीडियावर लोकप्रिय असलेले इंस्टाग्राम रील स्टार लखन चव्हाण, ओम पावले, खंडू तात्या आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. सन्मानितांमध्ये प्रमोद रामदासी, लक्ष्मीकांत रुईकर, आदिम राज बहुउद्देशीय संस्था (रामू मोते), सुशील हरिभाऊ कोळेकर, पसायदान सेवा केंद्रचे गोवर्धन दराडे, सरोज आनंदकर (नागपूर), संगीता माने (क्राईम ब्रँच, मुंबई), प्रमोद गोरक्षनाथ चांदणे, प्राची चांदणी, देविदास उत्तम शेलार, नयना रतन कानडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी प्रभावीपणे केले. प्रतिष्ठानचे सदस्य गणेश माने, किशोर कुलकर्णी, प्रकाश देवा, जाकीर भाई, विकास धोत्रे, गुड्ड्या जोगदंड, महादेव सवाई, मीनाक्षी देवकते, नयना भाकरे, नेहा साबळे व इतर सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.भव्य-दिव्य स्वरूपात पार पडलेल्या या सोहळ्याच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानत कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे.

**मध्य पूर्वेत...**

पॅलेस्टाईन, कतार आणि इराणमध्ये राहणा-या किंवा प्रवास करणा-या भारतीयांना विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तसेच तेल अवीवमधील भारतीय दूतावासाने सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

भारतीय नागरिकांना इस्रायली प्रशासन आणि होम फ्रंट कमांडच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आणि अनावश्यक प्रवास टाळावा असे सांगण्यात आले आहे. दरम्यान, या भागातील परिस्थिती अजूनही गंभीर आहे. अनेक देशांमध्ये सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. भारतीय दूतावास सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. नागरिकांना सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचा सल्ला देत आहेत. एकंदरीत, मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिकांना सतर्क राहण्याचे, अनावश्यक प्रवास टाळण्याचे आणि त्यांच्या दूतावासांच्या संपर्कात राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

तेहरान येथील भारतीय दूतावासाने इराणमध्ये राहणा-या भारतीय नागरिकांसाठी एक नवीन सूचना जारी केली आहे. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दूतावासाने सर्व भारतीयांना जास्तीत जास्त सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी अनावश्यक बाहेर पडणे टाळावे आणि शक्य तितके घरातच राहावे. भारतीय नागरिकांना नियमितपणे माहिती घेण्याचा, परिस्थितीबद्दल अपडेट राहण्याचा आणि दूतावासाकडून पुढील माहितीची वाट पाहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधण्यासाठी काही नंबर जारी करण्यात आले आहेत.

**समाजातील प्रत्येक....**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी वैकंठधामवासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर वाटाणे लॉन वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार व पदाधिकारी सन्मान पार पडला.

वाटाणे लॉन येथे आयोजित राज्यस्तरीय पत्रकार संघाचे २७ वे अधिवेशनाचे उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते थाटात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह भ प. दिनकरराव वाटाणे होते. विशेष आशिर्वाद उपस्थिती म्हणून आयोध्या मंदिर कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांचे बंधू भागवताचार्य प.पु. रमाकांत व्यास, श्री महाकाली संस्थान कासोळा देव येथील प.पु. गजानंद माऊली, तर विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे,, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपाध्यक्ष राजु भांदुर्गे, , वाशिम अर्बन बँक अध्यक्षा श्रीमती शिला राठी, डॉ. हेमराज लाहोटी, , माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, , मुख्य समन्वयक डॉ. हरीश बाहेती , स्वागताध्यक्ष गिरधारीलाल सारडा, आयोजन समिती कार्याध्यक्ष शिवाजीराव वाटाणे, सह स्वागत अध्यक्ष देवेंद्र खडसे पाटील,ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे,व्यापारी मंडळ जिल्हाध्यक्ष जुगलकिशोर कोठारी, , प्रदेश प्रसिध्दीप्रमुख नवनाथ जाधव, रिपाइं आठवले गट जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे, नूतन प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, , प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, किशोर रायसाकडा, कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, पश्चिम विदर्भ प्रमुख अनुप कुमार भार्गव, सुरेश खोसे, रवींद्र गुरव,विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, अमरावती विभागीय अध्यक्ष

## पान १ वरून...

सुनिल फुलारी, चर्मकार समाज जिल्हाध्यक्ष दिपक ढोके समवेत मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर व मातोश्री वैकुंठधामवासी सो.स्नेहलता सोमानी यांच्या प्रतिमेचे पूजन हार अर्पण व दीप प्रजलवन करण्यात आले.

सदर कार्यक्रमात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना महाराष्ट्र भूषण, भागवताचार्य डॉ. रमाकांत व्यास यांना संत सेवाश्री पुरस्कार, दिनकरराव वाटाणे यांना वारकरी सेवा पुरस्कार, राधेश्याम चांडक विदर्भ भूषण, सुलतानपूर येथील सुप्रसिद्ध डॉक्टर हेमराज लाहोटी यांना विदर्भभूषण,डॉ. हरिष बाहेती व डॉ. सरोज बाहेती विदर्भ भूषण, ह.भ.प. पंकजपाल महाराज विदर्भ गौरव, श्रीमती शिलाताई राठी जीवन गौरव पुरस्कार, माधवराव पुरस्कार जीवन गौरव पुरस्कार, देविदास पाटील राऊत गौसेवक पुरस्कार, जेष्ठ साहित्यीक स्व. भाष्करराव मुंढे यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार, समाजसेवक मिलींद भावसार उद्योजक पुरस्कार, गोपाल गिरधारीलाल सारडा उद्योजक पुरस्कार, स्वप्नील देवेंद्र खडसे पाटील उद्योजक पुरस्कार, अमोल पाटणकर वाशिम जिल्हा भूषण, वास्तुविशारद हर्षद शर्मा वाशिम रत्न पुरस्कार, शेखर बंग समाजसेवक पुरस्कार, मोहित कर्नावट युथ आयकॉन पुरस्कार, अविनाश मारशेटवार सेवारत्न पुरस्कार, शाम सवाई आदर्श समाजसेवक पुरस्कार, प्रविण पट्टेबहादुर यांना सेवारत्न , मनीष डांगे यांना दिव्यांग सेवक, समाजसेविका सौ संगीता वसंत इंगोले,योग प्रशिक्षक सौ.दीपा रवि वानखेडे, वास्तु विशारद सौ.अर्चना मेहकरकर, योग प्रशिक्षक सौ . तारा राजू कलवार यांना नारीरत्न पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. आकर्षक सन्मान चिन्ह , सुवर्णपदक व वामनराव पै यांची विश्व कल्याण पार्थना सर्वांना प्रदान करण्यात आली. तर आदर्श संस्था म्हणून केशव गौरक्षण मंगरुळपीर ,छाया फाऊंडेशन वाशिम, वारकरी सेवा संस्था वांगी, पिरॉमिड स्पिरिचुअल सोसायटी मुवमेंट वाशिम, तिरुपती सेवा गृप परिवार, वाशिम यांना सन्मानीत आले. कार्यक्रमांमध्ये राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष व वरिष्ठ पदाधिकारी यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी भागवताचार्य प.पू.रमाकांत व्यास यांनी जीवनात परिवार व समाजातील लोकांची आपले वागणे कशा प्रकारचे ही गोष्ट महत्वपूर्ण आहे, मंदिरात जाणाऱ्या व्यक्ती घरातील आई-वडील व ज्येष्ठांचा अपमान करत असेल तर त्याचे मंदिरात जाणे व्यर्थ आहे असे सांगून पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून दुर्लक्षित घटकांना न्याय मिळवून देण्याची भूमिका वटवावी असे आव्हान केले. परमपूज्य गजानंद माऊली यांनी माणूस धनाने नव्हे तर मनाने मोठा पाहिजे. समाजामध्ये आपल्या लेखणीच्या माध्यमातून वाईट कृत्य घडणार नाही कुणाचेही मने दुखावले जाणार नाही याची दक्षता घेणे जरुरी आहे निंदकाला सुद्धा आपण धन्यवाद दिले पाहिजे कारण त्याच्यामुळे आपल्याला चांगले कार्य करण्याचे बळ मिळते. लोकशाहीच्या नैतिक मूल्याचे रक्षण करणे हे पत्रकारांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तधनंतर द्वितीय सत्रात पत्रकारांचा डिएनए काय व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण तर होत नाही ना ? व सायबर युगातील माध्यमे आणि मुल्यनिष्ठ पत्रकारीता या विषयावर ज्येष्ठ संपादक डॉ राजेश राजोरे यांनी सत्य, संयम व समाजहित हाच पत्रकाराचा खरा डीएनए आहे, असे सांगून माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा यांच्या निधनानंतर ज्या प्रकारचे वृत्तांत मीडियाने केले त्यावर चिंतन करण्याची वेळ आली आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर अशा प्रकारच्या चुकीच्या संकल्पना समाज माध्यमातून पोहोचवणे घातक असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकारांनी नेहमी सत्याची बाबी उचलून धरावी असेही त्यांनी सांगितले. पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्याची माहिती सर्वांसमोर ठेवली. पत्रकारांसाठी शासनाने लाडकी बहीण योजनेप्रमाणे लाडका पत्रकार योजना सुरू करण्याची मागणी केली, अधिवेशनामध्ये त्यांनी विविध ठराव मांडले त्याला सर्वांनी एकमताने मान्यता प्रदान केली. सदर कार्यक्रमामध्ये सहकार्य करणार्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. श्री संत सावता माळी व्यायाम प्रसारक मंडळ, रनचंडिका बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित श्री संत सावता माळी क्रीडा मंडळ यांच्या विद्यार्थ्यांनी शिवकालीन युद्ध कलेचे प्रात्यक्षिक सादरीकरण केले, श्री संत ज्ञानेश्वर माऊली वारकरी संस्थेच्या वतीने वारकरी दिंडी द्वारा मान्यवरांचे स्वागत करण्यात आले, श्री विश्वमांगल्य महासभा वतीने लेझीम पथकाच्या द्वारे मान्यवरांचे स्वागत केले, सदर प्रात्यक्षिक व सादरीकरणाने सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फिटले याकरिता गुरुवर्य अंबादास इंगोले , राजू राऊत, दामोदर इंगोले, केशव इंगोले ,प्रवीण राऊत, संगराताई चुंबळकर यांचे सहकार्य लाभले. संत व मान्यवर यांचे आगमन पवन शर्मा यांच्या वतीने वेडिंग इव्हेंट मॅनेजमेंट द्वारे रॉयल विंटेज कारच्या माध्यमातून धमाकेदार पद्धतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश सोमानी, संचालन नेहा काळे व राशी राजपुरोहित तर आभार सुरेश टेकाळे यांनी मानले. सदर संमेलनाला संपूर्ण राज्यभरातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थित पत्रकार बांधव यांना आकर्षक बॅग,डायरी ,पेन, दिनदर्शिका भेट स्वरूपात देण्यात आली. वाशिम येथे कित्येक वर्षानंतर राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले असून ते यशस्वीपणे पार पडल्याने वाशिमचे नाव संपूर्ण राज्यात झळकले आहे. या यशस्वी अधिवेशनाची संपूर्ण राज्यात चर्चा होत आहे.

# पाटोदा नगरपंचायत सभापती निवडीत सुरेश अण्णा धस यांचे वर्चस्व; सर्व निवडी बिनविरोध

पाटोदा (प्रतिनिधी):

पाटोदा नगरपंचायतीच्या विषय समिती सभापतींच्या निवडी आज अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. भाजपचे ज्येष्ठ नेते आमदार सुरेश अण्णा धस यांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनाखाली झालेल्या या प्रक्रियेत सर्व पाचही पदांच्या निवडी बिनविरोध झाल्या आहेत. यामुळे पाटोदा नगरपंचायतीवर सुरेश अण्णा धस यांची पकड पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.



नूतन सभापतींची नावे खालीलप्रमाणे:नगरपंचायतीच्या विविध समित्यांच्या रिक्त असलेल्या सभापती पदांसाठी आज विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खालील सदस्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली:

सार्वजनिक बांधकाम सभापती: मकराणी उमर जुबेर नियोजन, विकास व अर्थ सभापती: काळे अश्विनी हनुमंत शिक्षण, आरोग्य व क्रीडा सभापती: आडागळे किशोर परमेश्वर महिला व बालकल्याण सभापती: गोरे आरती रामेश्वर महिला व बालकल्याण उपसभापती: वाघमारे निलावती कुंडलीक

प्रशासकीय प्रक्रिया

या निवडीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांनी काम पाहिले, तर त्यांना सहाय्यक पीठासीन अधिकारी म्हणून नायब तहसीलदार तथा मुख्याधिकारी अभय जोशी यांनी सहकार्य केले. विहित मुदतीत प्रत्येक पदासाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने पीठासीन अधिकाऱ्यांनी या निवडी बिनविरोध झाल्याचे घोषित केले.

उपस्थिती आणि जल्लोष

या निवड प्रक्रियेवेळी पाटोदा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष आणि सर्व सन्माननीय नगरसेवक उपस्थित होते. निवडी जाहीर होताच समर्थकांनी गुलालाची उधळण करत आणि फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष केला. आमदार सुरेश अण्णा धस यांचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

नूतन सभापतींनी आपल्या निवडीनंतर बोलताना सांगितले की, आमदार सुरेश अण्णा धस यांनी जो विश्वास आमच्यावर टाकला आहे, त्या विश्वासाला पात्र राहून पाटोदा शहराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध राहू

# जि. प. (अनु.) माध्यमिक शाळा वाघेबाभुळगावची परीक्षेत उत्तुंग भरारी; ९ विद्यार्थी उत्तीर्ण

केज । वार्ताहर तालुक्यातील जि. प. (अनु.) माध्यमिक शाळा वाघेबाभुळगाव येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या छचडड परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यावर्षी शाळेचे एकूण ९ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून, राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा

शाळेचे मुख्याध्यापक श्री. धनगर सर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य मा. श्री. प्रेमचंद कोकाटे, माजी सरपंच श्री. रामदासजी वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. दिलीपजी झांबरे, केंद्रीय प्राथमिक शाळेचे शा.व्य.स. उपाध्यक्ष आदरणीय गणेशजी भोजने, पत्रकार मा. श्री. राजेभाऊ हांडगे, बाळासाहेब जाधव व श्री. गणेश हावळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



या सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून यशाचे रहस्य उलगडले, तर पालक प्रतिनिधी श्री. संदीप इंगोले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

मार्गदर्शन आणि संकल्प

कार्यक्रमात पत्रकार राजेभाऊ हांडगे व प्रेमचंद कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेचे शिक्षक श्री. ढेंगळे सर,श्रीमती.राख मॅडम, श्री. डोईफोडे सर व श्री. आरकडे सर यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून दिले.

# विवेकवादी विचाराचा प्रबोधनात्मक कीर्तन महोत्सव -किरण माने

## संतांची सर्वधर्मसमभाव शिकवण गरजेची - डॉ.कराड

परळी / प्रतिनिधी

वर्चस्ववादी विचाराने वैदिकांनी धर्माच्या नावावर समाजात पसरवलेली गुलामगिरी मोडीत काढणाऱ्या जगतगुरू तुकोबारायांच्या गाथा बुडविल्या, त्यांचे चारित्र्य विकृत पद्धतीने प्रसारमाध्यमातून समोर आणत प्रतिमा मलिन केली जात असताना संतांचे विवेकनिष्ठ विचार तळागळाला नेण्याचे काम हे कीर्तन महोत्सव करत असल्याचे प्रतिपादन विवेकवादी वक्ते तथा सिने अभिनेते किरण माने यांनी केले तर एक नारायण सर्वत्र दिसे भेदाभेद न मानावे अशी सर्वधर्म समभावाची संत तुकोबारायांच्या शिकवणीची आज समाजाला खऱ्या अर्थाने गरज असल्याचे डॉ.डी.एल.कराड यांनी सांगितले. जगतगुरू संत तुकाराम महाराज बीजे निमित्ताने आयोजित गाव समूहाच्या शेतकरी कीर्तन महोत्सवाचे उदघाटन संतसाहित्य अभ्यासक तथा सिने अभिनेते किरण माने, कामगारांचे राष्ट्रीय नेते डॉ.डी. एल.कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि २८ रोजी कान्नापूर येथे संपन्न झाले.

आपल्या अभ्यासपूर्ण संत विचारांची मांडणी करताना किरण माने यांनी सांगितले की, समाजात वर्चस्ववादी विचार रुजविण्यासाठी काही शक्ती प्रयत्नशील असून संत, महापुरुष यांच्या एक-दोन चांगल्या गोष्टीसोबत त्यांची प्रतिमा मलिन करून चारित्र्य विकृती करणाऱ्या खोटा समज समाज मनावर रुजविण्याचे काम सुरू असून अंधश्रद्धा, भोंदूगिरी याचा पगडा घट्ट होत असताना जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरीं वरीं ।।१।।अंतरींचें शुद्ध कासयानें जालें । भूषण तों केलें आपणया ।। तुकोबारायांच्या अभंगातून सांगितल्याप्रमाणे तीर्थयात्रेला जाऊन, पवित्र नद्यांमध्ये स्नान करून वर वर देहाची कातडी धुवून उपयोग



नाही तर अंतकरण शुद्ध असणे गरजेचे आहे. तुकोबाराय उत्कृष्ट अर्थतज्ञ, राजनीतीकार, मानसोपचार तज्ञ, कुशल व्यावसायिक यासोबत कृषी तज्ञ देखील असल्याचे सांगत जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ।। उत्तम चि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।। असा व्यवसाय समृद्धी करण्याचा तर सेत आलें सुगी सांभाळावे चारी कोण । पिक आलें परी केलें पाहिजे जतन ।। सोंकरीं सोंकरीं सोहंकरी । विसावा तों वरी नको उभें आहे तों हा दाखला देत शेतकऱ्यांनी आपल्या शेताची आणि शेतातील पिकांची निगा कशी राखावी हे शेकडो वर्षांपूर्वी आपल्या गाथेतून सांगितले आहे. संतांचे, महापुरुषाचे विचार आजमितीस नाशविण्याचे काम मोठ्या शक्तीने सुरू असून हा शेतकरी कीर्तन महोत्सव विवेकनिष्ठ संत विचार तळागाळात पोहचविण्याचे काम करत आहे ही कौतुकास्पद बाब आहे असे त्यांनी सांगितले तर अध्यक्षस्थानी असलेले कामगारांचे नेते डॉ.कराड यांनी वारकरी संप्रदायाचे बाजारीकरण झाले असताना संतांनी मांडलेला समतेचा, कष्टाचा विचार हा भौतिक बदलापेक्षा अंतर्मन बदलून माणूस म्हणून जगण्याचे सामर्थ्य या कीर्तन महोत्सवातुन साध्य होऊ शकते. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद-भ्रम अमंगळ।। या उक्तीप्रमाणे संपूर्ण जग हे विष्णुमय अर्थात मानवतावादी असल्यामुळे कुठल्याही प्रकारचा भेदाभेद मानणे हे अमंगळ असून जातीभेद असो व धर्मभेद. कुणाचाही मत्सर किंवा हेवा न करता जे कां रंजले गांजले । त्यासि ह्मणे जो आपुले ।। तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।। हे प्रत्येकाने जाणूनघेऊन संतांचे विचार आचरणात आणणे गरजेचे आहे असे सांगितले.

या शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी स्वतः शेतकरी आणि ज्यांची दोन्ही पाल्य स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन उच्च पदस्थ अधिकारी बनलेले आहेत असे जागरूक पालक असलेले हभप मधुकर महाराज बारुळकर संत विचार मंथन मंचावर उपस्थित होते. या प्रसंगी संयोजकांनी बारुळकर महाराज यांचा यथोचित सन्मान केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ब्रम्हानंद देशमुख तर ऋणव्यक्त विशाल देशमुख यांनी केले. या उदघाटन प्रसंगी पंचक्रोशीतील शेकडो ग्रामस्थ, शेतकरी व महिलांची उपस्थिती होती. उदघाटन सत्रानंतर नामदेव-तुकाराम परिषदेचे हभप मधुकर महाराज बारुळकर यांचे कीर्तन संपन्न झाले. पहिल्या दिवशी दुपारी म्हतारगाव तर रात्री सरफराजपूर ग्रामस्थांनी भोजन पंगतीचे जबाबदारी पूर्ण केली.

# जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी विधानसभेत आवाज उठविला याबद्दल केज वासियांच्या वतीने आमदार नमिताताई मुंदडा यांचे आभार

केज/प्रतिनिधी

केजच्या गरीब व सामान्यांच्या मुलामुलीं च्या उज्वल शैक्षणिक भविष्याचा सर्वोत्तम पर्याय असणारी व बंद पडण्याच्या मार्गांवर असणारी केजची जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पुन्हा नव्याने सुरु करण्या साठी केजच्या आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांनी शाळेचा मुद्दा विधानसभेत मांडून केजवासियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल केजवासिय व या शाळेच्या माजी विद्यार्थी संघ यांच्या वतीने अभिनंदन व आभार मानले आहेत.

केज शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ही एकेकाळी शहरातील एकमेव वैभवप्राप्त शाळा होती.मात्र अलीकडील काळात खाजगी शिक्षण संस्थांचे वाढते वर्चस्व व केजच्या नागरिकांचे शाळेकडे नकळत झालेले दुर्लक्ष यामुळे शाळा मोडकळीस आली होती. विद्यार्थी संख्या अभावी शाळा बंद करण्याचा निर्णय शासन स्तरावर चालू असतानाच सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी शाळेच्या गतवैभवाचा इतिहास व सद्यस्थिती याबद्दल सोशल मीडिया वर जागृती केल्यानंतर शाळेचे माजी विद्यार्थी भाई मोहन गुंड,सुनिल हुलसूळकर,अभय कुलकर्णी,तय्यब शेख, गणेश





सुरवसे व शेकडो माजी विद्यार्थी यांनी २६ जानेवारी २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात भव्य मेळावा व प्रभातफेरी काढून शाळा पुन्हा नव्याने सूरु करण्याचा निर्धार केला आहे.शाळा पुन्हा नव्याने सुरु करण्या साठी जोरदार तयारी सूरू असून आता स्वतः आमदार नमिताताई मुंदडा यांनी पुढाकार घेवून शाळेला भेडसावणाऱ्या समस्या विधानसभा सभागृहात मांडल्याने आता येथील सामान्य व गरीब विद्यार्थ्यांसाठी या शाळेचे दरवाजे येत्या जून २०२६ पासून उघडणार आहेत.

आमदार नमिताताई मुंदडा यांनी शासन दरबारी शाळेच्या समस्या मांडल्याबद्दल त्यांचे दि.७ मार्च रोजी केज येथे आगमनाच्या निमित्ताने केज पंचायत समिती येथे त्यांचा छोटेखानी कार्यक्रमात सत्कार करून आभार व्यक्त करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले,भाई मोहन गुंड,समीर देशपांडे,पिंटू दांगट,

# मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थिनींना बक्षीस वाटप संपन्न

केज/प्रतिनिधी

केजशहरातील नामांकित शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जय भवानी कन्या शाळा येथे नगर पंचायत केजच्या वतीने निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.पी.एम देशमुख हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून केजच्या प्रथम नागरिक तथा नगराध्यक्ष डॉ.सौ. सीताताई बनसोड,तसेच केज शहराचे ज्येष्ठ नेते डॉ.हारूणभाई इनामदार व युवा नेतेरणजीतदादा आडसकर,शाळेचे ज्येष्ठ शिक्षक खुळे के.व्ही. यांची प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.प्रथम सरस्वती पूजनानंतर प्रमुख पाहुण्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.यानंतर यांना चित्रकला,स्पर्धेतून निबंध स्पर्धेत प्रथम,द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. निबंध स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम तांबवेकर भावना दत्तात्रय व वर्ग नववा, द्वितीय निकम



मानसी मेघराज वर्ग सातवा,व तृतीय लांडगे सई दिनेश वर्ग सहावा तर चित्रकला स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम

नाईकनवरे ऋतुजा तुकाराम वर्ग सातवा, द्वितीय सय्यद आयेशा फिरोज वर्ग आठवा, व तृतीय चौरे अमृता श्रीकृष्ण वर्ग पाचवा या विद्यार्थिनीचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.यानंतर शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक श्री.पी.एम देशमुख यांनी प्रास्ताविक केले.यावेळी बोलताना त्यांनीशाळेच्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार होणे ही शाळेच्या बाबतीत अभिमानास्पद बाब असल्याचे सांगितले याचा आम्हाला मला अभिमान असल्याचे आवर्जूनसांगितले.

केजच्या नगराध्यक्ष डॉ.सौ.सीताताई बनसोड यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना आजही समाजात पुरुष आणि महिला किंवा मुलगा आणि मुलगी यामध्ये भेदभाव केला जातो.परंतु मुलींनी मुलापेक्षा आम्ही कशातही कमी नसल्याचे दाखवले आहे.याचेच उदाहरण म्हणजे मी एक महिला आज केज शहराची नगराध्यक्ष व प्रथम नागरिक असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.मुलींनी प्रत्येक क्षेत्रात आगेकूच करावी असेही त्यांनी आवाहन केले.ज्येष्ठ नेते डॉ. हारूणभाई इनामदार यांनी केज शहराच्या स्वच्छतेसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे सांगताना सर्वविद्यार्थ्यांनी व शिक्षकांनीही यासाठी अग्रेसर राहणे गरजेचे असल्याचे सांगितले. केवळ स्वच्छता हा आमचा अधिकार आहे असे न म्हणता स्वच्छते साठी काम करणे माझेही कर्तव्य आहे असे म्हणणे गरजेचे आहे.तरच स्वच्छता व निरोगी वातावरण शहरात तयार होईल असे सांगितले.

आभार प्रदर्शन शाळे तीलज्येष्ठ शिक्षक श्री खुळेके.व्ही यांनी केले. यावेळी त्यांनी शाळेच्या विकासासाठी विद्यार्थी पालक व शिक्षण प्रेमी त्याचप्रमाणे रणजीत भैया आडसकर यांची सातत्याने पाठबळ मिळत असते म्हणूनच आम्ही शाळेमध्ये वेगळे उपक्रम राबवू शकतो असे सांगितले व कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले.कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्री. गिरी एस.एम यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप शिंदे बी.एम यांनी केला.

# चार तासांत केज शहर झाले चकाचक! केज शहरात स्वच्छता अभियानात १५०० श्री सदस्यांचा सहभाग




## डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा उपक्रम

केज/प्रतिनिधी

स्वच्छता अभियानावर शासनस्तरावर कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो परंतु रेवदंडा जि. रायगड येथील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी दि. १ मार्च २०२६ रोजी केज शहरात सुमारे १५०० श्रीसदस्यांनी स्वच्छते साठी रस्त्यावर उतरून अवघ्या चार तासांत संपूर्ण शहर चकाचक केले.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.केज नगरपंचायती च्या सहकार्याने सकाळी सात ते अकरा वाजेपर्यंत केज शहरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.अभियानास छत्रपती शिवाजीमहाराज चौकातून सुरुवात झाली. चौकाची योग्य आकर्षक रांगोळी काढून स्वच्छता अभियानाला प्रारंभ करण्यात आला.पद्मश्री डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी तसेच डॉ. श्री.सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव,तुळजापूर, लातूर,बीड,वाशी परिसरातून दीड हजार श्री सदस्य झाडू घेऊन रस्त्यावर स्वच्छतेसाठी उतरले.प्रतिष्ठानतर्फे सदस्यांना हातमोजे, मास्क आदी साहित्य पुरविण्यात आले होते. या अभियानासाठी केज नगरपंचायतीतर्फे १० घंटागाड्या,३० ट्रॅक्टर तसेच ३ जेसीबी उपलब्ध करून देण्यातआल्या होत्या.या महाअभियाना मध्ये सर्व सदस्यांनी चार तासांत सुमारे ८२ टन सुका कचरा व ४० टन ओला कचरा असा एकूण १२२ टन कचरा संकलित केला.जमा झालेला कचरा घंटागाड्यांमधून नियोजनबद्ध पद्धतीने उचलण्यात आला.सकाळी ठीक सात वाजता केजच्या श्री छत्रपती शिवाजी चौक येथून केजच्या नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड,केज नगरपंचायतचे मुख्याधिकारी अजित ढोपे,रमेशराव आडसकर डॉ.हारुणभाई इनामदार, हनुमंत भोसले,फुलचंद भाऊ जाधव, सचिन मुळे व शहरातील सर्व क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या स्वच्छताअभियानाला सुरुवात झाली.या महा अभियाना अंतर्गत केज शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून भवानी चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,बालाजी मंदिर,जुने केज हनुमान मंदिर परिसर,कळंब रोड,धारूर रोड,कानडी रोड,उमरी रोड सह केज शहरातील रस्ते व प्रमुख शासकीय कार्यालये तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय,न्यायालय व विश्रामगृह परिसर स्वच्छ करण्यात आले.या महा स्वच्छता अभियानाने केज शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छते बद्दल जागृती होण्यास मदत झाली आहे.बाहेर गावचे नागरिक अत्यंत निष्ठा व श्रद्धेने आपल्या गावात येऊन स्वच्छता करताना पाहून केजच्या नागरिकांत स्वच्छतेबद्दल मोठी जनजागृती झाल्याचे दिसून आले.केज नगरपंचायत ने विशेष आभार पत्राद्वारे डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे आभार मानले आहेत.

# ‘कृषी स्पंदन ’ महोत्सव जल्लोषात संपन्न





बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा कृषी विभागांतर्गत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय व अधिनस्त उपविभागीय कृषी अधिकारी तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे म्हणजेच कृषी स्पंदन ’ महोत्सवाचे दिनांक २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवाची सुरुवात दि. २८.०२.२०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे शिवाजी बटेवाड (पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा बीड) यांच्या हस्ते दिमाखात झाली. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री. सुभाष साळवे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी कृषी विभागाच्या योजनांद्वारे शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कर्मचाऱ्यांचे योगदान विषद केले आणि सांघिक खेळाचे महत्त्व सांगितले. प्रमुख पाहुणे बटेवाड यांनी खेळातून आरोग्य व मनःशांती मिळवण्याचा सल्ला दिला.यावेळी पथ संचलनाच्या माध्यमातून महाविस्तार -ख ॲप,जागतिक महिला शेतकरी वर्ष,जल व मृदसंधारण चे महत्व तसेच ड्रोन द्वारे फवारणी याबाबत देखावे सादर करून त्याचे महत्व अधोरेखित केले गेले.

क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम

हा महोत्सव दोन दिवसीय असून यामध्ये विविध स्पर्धांचा समावेश होता यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ, गोळाफेक आणि धावणे (१००, २०० व ४०० मी.) यांचा समावेश होता.

पथसंचलन: तालुका व जिल्हा स्तरीय कर्मचाऱ्यांनी शानदार पथसंचलन केले. यामध्ये लेझीम पथक, वारकरी दिंडी, आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त महिलांचे पथक, पिकांवरील फवारणीचे बदलते तंत्रज्ञान आणि -ख विस्तार प या विषयांचा समावेश होता.

सांस्कृतिक कार्यक्रम: दि. २८.०२.२०२६ रोजी सायंकाळी स्वागत लॉन्स, चरहाटा फाटा, बीड येथे सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. यात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गायन व नृत्य सादर करून आपल्या



कलागुणांचे दर्शन घडवले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी उपसंचालक जाधवर यांनी केले. या कार्यक्रमास प्रसिद्ध पटकथाकार आणि लेखक अनिल कुमारजी होळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून 'माणुसकी जपण्याचा' मूलभूत मंत्र दिला.

सहकार्य व आयोजन

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी जाधवर कृषी उपसंचालक, राहुल गायकवाड उपविभागीय कृषी अधिकारी, अंबाजोगाई,श्रीमती भवारी उपविभागीय कृषी अधिकारी, माजलगाव,उद्धव गर्जे उपविभागीय कृषी अधिकारी, सूरज पाटील प्रकल्प उपसंचालक, आत्मा,साहिल कृषी विकास अधिकारी, जि.प.,सर्व तालुका कृषी अधिकारी,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील सर्व तंत्र अधिकारी कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले.

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

बीड ।प्रतिनिधी

येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये शनिवार, दि. २८ रोजी ‘राष्ट्रीय विज्ञान दिन’ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी. डी. राऊत, गुरुकुल कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल तसेच डॉ सुनील जोंधळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांनी अध्यक्षस्थान भूषवून मान्यवरांचे स्वागत केले. उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देणारे विचार मांडले.



विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, प्रदूषण नियंत्रण, सौर ऊर्जा आणि अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर दर्शवणारे उत्कृष्ट प्रकल्प सादर केले. विशेषतः टाकाऊ वस्तूंपासून बनवलेली टिकाऊ वैज्ञानिक मॉडेल्स आणि जीवशास्त्र व भौतिकशास्त्रातील कठीण सिद्धांत प्रयोगांच्या माध्यमातून मांडून विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

प्राचार्या उमा जगतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. या प्रदर्शनाला पालकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# संस्कार मध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न

बीड ।प्रतिनिधी

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन अतिशय उत्साहात संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागात संपन्न झाला. या निमित्ताने सांस्कृतिक विभागाकडून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रथमतः मुख्याध्यापक श्रीमती शोभाताई कुलकर्णी व विभाग प्रमुख विद्याताई पारगांवकर यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती माता व कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या वक्त्या सहकारी शिक्षिका श्रीमती कुलकर्णी डी यू यांनी कुसुमाग्रजांची ओळख करून देऊन



त्यांची लेखन संपदेची माहिती सर्व विद्यार्थ्यांना दिली. त्यासोबतच श्रीमती आहीर जे आर यांनी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या कविता गायन केल्या.

देशमुख सर यांनी कुसुमाग्रजांची ’कणा’ ही कविता अतिशय प्रभावीरित्या गायनासह विद्यार्थ्यांना समजावली.

# बीड नगरपरिषदेत पहिल्याच सर्वसाधारण सभेत

# सभापती आरती बनसोडे यांचा नागरिकहिताचा ठोस आवाज गाजवला

बीड । प्रतिनिधी



नगरपरिषदेत झालेल्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत सभापती आरती रंजीत बनसोडे यांनी प्रभागातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवला. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये या सर्व प्रश्नांचा समावेश करून विकासकामांना गती देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सभेत त्यांनी प्रामुख्याने स्वच्छता व सफाई व्यवस्थेचा मुद्दा मांडत प्रभागात नियमित घंटागाडी सुरू ठेवण्याची मागणी केली. तसेच नवीन सिमेंट रस्ते व नाल्यांचे बांधकाम, तुळजाई चौक ते कृषीनगर , पंचशील नगर परिसरात मुख्य नाल्यासाठी निधी तरतूद, पालवन चौक परिसरातील नाल्याचा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी नवीन नाला गोरे यांच्या घराकडील ओढ्याकडे वळविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली या बाबींकडे नगराध्यक्षा पारवे ताई यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

डीपीडीसी अंतर्गत धानोरा रोडच्या उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करून देणे, अमृत योजनेअंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण करणे व नवीन नळ कनेक्शन सुरू करणे, ज्या भागात पाईपलाईन जोडलेली नाही तेथे तत्काळ जोडणी करणे, अशी मागणीही त्यांनी केली. प्रभागात नवीन सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीसाठी तरतूद करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला.

सामाजिक बांधिलकी जपत सर्वे नंबर १८९ पिंगळे तरफ येथे समाजमंदिर उभारणे, प्रभागात आधुनिक डिजिटल अंगणवाडी सुरू करणे, तसेच गार्डन डेव्हलपमेंटसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. अपंग व्यक्तींना नगरपालिकेच्या एकूण उत्पन्नातून जास्तीत जास्त निधी राखीव ठेवावा, अशीही मागणी त्यांनी सभेत केली.

याशिवाय नगरपरिषद प्रशासक काळातील तत्कालीन मुख्याधिकार्यांच्या कामकाजातील कथित भ्रष्टाचाराची चौकशी करून लेखापरीक्षण करावे व संबंधितांवर कारवाई करावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

राष्ट्रीय नागरिक उपजीविका अभियानांतर्गत ‘जिव्हाळा’ शहरी बेघर निवारा केंद्रासाठी बंद करण्यात आलेले अनुदान पुन्हा सुरू करावे, अशी मागणीही त्यांनी उपस्थित केली.

आमदार विजयराजे पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सभापती आरती बनसोडे यांनी मांडलेले हे सर्व प्रश्न २०२६-२७ च्या विकास आराखड्यात समाविष्ट केले जाणार असून प्रभागातील रखडलेली कामे मार्गी लागतील, धानोरा रोडच्या जागेचा मावेजा देण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे,असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तसेच नगरसेवक प्रमोद शिंदे यांनी देखील विविध प्रश्न उपस्थित केले. नगरपरिषदेच्या पहिल्याच सभेत नागरिकहिताचे ठोस मुद्दे मांडून सभापती बनसोडे यांनी विकासाभिमुख नेतृत्वाची छाप पाडली आहे.



बीड - ह भ प मेगडे महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन महोत्सव प्रसंगी भाजपाचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील. यावेळी वबाबुराव परळकर, पांडुरंग रांजण महाराज इत्यादी भाविक भक्त उपस्थित होते.


महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

यांत्रिकी मंडळ, नांदेड यांत्रिकी विभाग,बीड

## निविदा सुचना क्र.४७ सन २०२५-२६

खालील कामाच्या ब-१ (टक्केवारी दर) नमुन्यातील दोन पाकिटाच्या पध्दतीत मोहोरबंद निविदा कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नगर रोड, बीड जिल्हा बीड -४३११२२ (दुरध्वनी कार्यालय - २२२४१९) यांचे तर्फे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग यांत्रिकी संघटने अंतर्गत संबंधीत प्रकाराच्या कामे करणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदा नियम व अटींच्या अधीन राहुन, कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग, नगर रोड, बीड यांचे कार्यालयात सुटीचे दिवस सोडून दि.२६.०२.२०२६ ते ०५.०३.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत दिल्या जातील व निविदा दिनांक ०५.०३.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी १७.०० वाजताच्या पुढे उघडल्या जातील.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रू. | इसारा रक्कम रू. (१%) | सुरक्षा रक्कम ठेव रक्कम रू.(२%) | निवीदा संचाची किंमत रू. | महत्वाचे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सयंत्र Tata Hitachi EX-120 No.51229 याचे अंडरकॅरेज असलेली उजवी बाजुचे ट्रक रोल, चैन, बोल्ट, नट बुश इत्यादीचे दुरूस्ती काम करणे बाबत. | २,०५,८०१/- | २०५८/- | ४११६/- | १०००/- + जी.एस.टी. १८% ना परतावा | कंत्राटदारास सदरील कामाचा पुर्व अनुभव असणे आवश्यक आहे व जीएसटी नोंदणी क्रमांक बंधनकारक आहे. तसेच इसारा/बयाणा रक्कम भरणे बंधनकारक असेल इसारा /बयाणा रक्कम भरण्यापासुन कसल्याही प्रकारची सुट दिली जाणार नाही. |

१. कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामुल्य देण्यात येईल.
२. वरील निविदेतील दर हे निविदा उघडल्याच्या दिनांकापासून (३६०) दिवसापर्यंत बंधनकारक राहतील.
३. कोऱ्या निविदा संचाची किंमत फक्त रोखीने स्विकारण्यात येईल.
४. निविदा पोस्टाने मागविल्यास मोहोरबंद लिफाफा देवाण घेवाण करण्यात खराब झाल्यास किंवा निविदा अर्ज मिळण्यास कोणताही विलंब झाल्यास अथवा गहाळ झाल्यास, त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. निविदा टपालाने पाहिजे असल्यास रू.१००/- जादा आकार पाडेल.
५. जीएसटी अधिनियम अन्वये प्राप्त केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत प्रमाणित करून जोडावी.
६. कोणतीही निविदा अगर सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा/रद्द करण्याचा हक्क कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.
७. शासनाचे नि.क्र./मातंसं/नास्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९ दिनांक २६.११.२०२४ नुसार सदरील निविदा ई-टेंडरिंग प्रणालीत सामाविष्ट होत नाही.

स्वाक्षरित/-
कार्यकारी अभियंता
यांत्रिकी विभाग,बीड

जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/२७३



हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी-३ एम.आय.डी.सी.बीड-४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF WEEKLY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)

## सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक किरण असरडोहकर यांचे निधन

अंबाजोगाई( प्रतिनिधी) येथील मूळ रहिवासी आणि पुणे येथे स्थायिक असलेले सेवानिवृत्त पोलीस वायरलेस खात्यातील पोलीस उपनिरीक्षक श्रीयुत किरण रामराव



असरडोहकर यांचे आज रविवारी सकाळी पहाटे साडेतीन वाजता हृदयविकाराच्या झटक्याने पुणे येथील एका खाजगी रुग्णालयात दुःखद निधन झाले. ते ६६ वर्षांची होते, त्यांच्या पाश्चात पत्नी, विवाहित मुलगा, विवाहित मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी महाविद्यालयाचे ते माजी विद्यार्थी होते . श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी कार्यकारिणी सदस्य आणि सेवानिवृत्त अभियंता उदय असरडोहकर आणि ज्येष्ठ नागरिक अरुण असरडोहकर यांचे ते कनिष्ठ बंधू होते. पुणे येथील नांदेड सिटी जवळील शिवणी स्मशानभूमीत रविवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# चिमुकल्यांच्या कलाविष्कारांनी मानूर जि.प. शाळेचा स्नेहसंमेलन सोहळा रंगला

मानूर प्रतिनिधी

शाळा ही विद्यार्थ्यांचं भविष्य उज्वल करणार ज्ञानपीठ आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मानूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ अत्यंत थाटामाटात व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. श्री ष ब्र १०८ गुरुविरूपाक्ष शिवाचार्य महाराज, रामदास बडे, गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे साहेब, ठकशेन तुपे, पि.जी.पाखरे सर, केंद्रप्रमुख का.भा.खेडकर सर, मोहब्बतखान पठाण,जयसिंग शिरसाट,किशोर पवार,अमोल पवार, गहिनीनाथ सुरसे, सुभाष आप्पा शिरसाट,सलीम पठाण, भिवा पडागळे, भारत शिंदे, पत्रकार खलील भाई पठाण यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक सोहळ्याचे उद्धाटन संपन्न झाले. मुले नाविन्यपूर्ण असतात त्यांचा विकास साधणं हे शाळेचं कर्तव्य असतं. मानूर केंद्र शाळा सुंदर पद्धतीने विद्यार्थ्यांचे हित जोपासत आहे, असे मत मा जि.प. सदस्य रामदास बडे यांनी व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. शाळा म्हणजे विद्यार्थी व राष्ट्राचं उज्वल भविष्य साकारणारे ज्ञान मंदिर आहे. मानूर केंद्र शाळेतील सर्व शिक्षक तळमळीने विद्यार्थी घडवण्याचं पवित्र कार्य करत असल्याचा अभिमान वाटतो ,असे मत गुरु विरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमातील सुंदर कला पाहून ११०० रुपयांचे बक्षीसही दिले. मानूर केंद्र शाळेत नव्याने दाखल झालेले शिक्षक वृंद उत्कृष्ट पद्धतीने कार्य करत आहेत,असे मत गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे साहेब यांनी व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. देवा श्री गणेशा, मै देश झुकने नही दूँगा, मोबाईल थीम ज्यामधून मोबाईलचे दुष्परिणाम दाखवण्यात आले,



जलवा , दैवत छत्रपती, ईद मुबारक या गाण्यांना वन्स मोर करण्याचा आग्रह मानूरकर ग्रामस्थांनी धरला. एकापेक्षा एक सदाबहार कलाविष्कार मानूर केंद्रीय शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर करत उपस्थित सर्व प्रेक्षकांची मने जिंकली. बहुसंख्येने उपस्थित असलेल्या मानूरकरांनी टाळ्यांच्या गजरामध्ये विद्यार्थ्यांना प्रेरणा देत कार्यक्रमातील आनंदही लुटला. पहिली ते चौथी हा लहान वयोगट असतो मात्र या मुलांनी त्यांच्या क्षमतेपेक्षाही जास्त उत्कृष्ट नृत्य सादर करत कार्यक्रमाची उंची वाढवली.सहशिक्षिका आशा काळे मॅडम, ढाकणे मॅडम, केदार मॅडम यांनी संपूर्ण नृत्य स्वतः दिग्दर्शित केले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक मिठू आव्हाड सर, भारत सुरसे सर ,अनिल सानप सर, तसेच मानूर परिसरातील सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सदाबहार सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची शोभा शिवचरित्रकार कैलास तुपे सर, आशा काळे मॅडम यांनी वाढवली. मानूरकर ग्रामस्थांनी ४० हजार रुपयांच्या बक्षिसांची चिमुकल्यांच्या कलाविष्कारावर उधळण करत दाद दिली. आपण सर्वजण कष्टकरी आहात तुम्ही आमच्यावर विश्वास दाखवत जे बक्षीस शाळेला दिलेलं आहे ते सर्व मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठीच वापरलं जाईल येणाऱ्या काळात शाळेत अजून उत्तम पद्धतीचं व्यवस्थापन निर्माण केलं जाईल,असे विचार भारत सुरसे सर यांनी व्यक्त करत उपस्थित बहुसंख्य पालक ग्रामस्थांचे व शिरूर कासार तालुक्यातील उपस्थित प्राथमिक शिक्षकांचे आभार मानले. तुम्ही सर्वांनी आमच्यावर दाखवलेला हा विश्वास व्यर्थ जाणार नाही असेही यावेळी ते म्हणाले. जिल्हा परिषद केंद्रीय शाळा मानूर ने उत्कृष्ट कार्यक्रम घेतल्याबद्दल गावकऱ्यांनी त्यांचे कौतुक केले.

# 'बापूंचे बोरगाव' हीच आमच्या गावाची खरी ओळख

स्वातंत्र्यसेनानी सखाराम बापूंच्या स्मृतींना विद्यार्थ्यांनी दिला लेखणीतून उजाळा

जाफराबाद :- प्रतिनिधी हरी भालके

मराठवाडा मुक्तीसाठी संघर्ष केलेल्या कै. सखाराम बापू फदाट यांच्यासारख्या अनेक महान स्वातंत्र्यसेनानी मुळेच आज आपण मुक्त श्वास घेत आहोत. 'बापूंचे बोरगाव' हीच आमच्या गावाची खरी ओळख आहे, आणि हाच आमचा सर्वात मोठा स्वाभिमान आहे, अशा भावना जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव (बु.) येथील विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधांतून व्यक्त केल्या.

स्वातंत्र्य सेनानी सखाराम बापू फदाट यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या भव्य निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी बापूंच्या शौर्यगाथांना शब्दबद्ध केले. यावेळी बापूंच्या आठवणींना उजाळा देताना उपस्थित विद्यार्थी आणि ग्रामस्थ भावूक झाले होते.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ही स्पर्धा दोन गटांत घेण्यात आली होती. तज्ञ शिक्षकांनी निबंध तपासून विजेते घोषीत केले.यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी आणि पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

सखाराम बापू फदाट यांचे



कार्य केवळ बोरगावपुरते मर्यादित नव्हते. निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध त्यांनी दिलेला लढा आणि मराठवाडा मुक्तीसंग्रामातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे. नव्या पिढीपर्यंत हा प्रेरणादायी इतिहास पोहोचावा, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या धैर्यामुळेच या भागात क्रांतीची मशाल पेटत राहिली, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

# शेतात रंगली हुरडा पार्टी; ग्रामीण संस्कृतीचा सुगंध दरवळला

जामखेड /प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील जामखेड परिसरात पारंपरिक हुरडा पार्टीचा जल्लोष रंगला. हिरव्यागार गव्हाच्या पिकात, अंगाराच्या मंद आचेवर भाजल्या जाणाऱ्या ओब्यांचा दरवळता सुगंध आणि शेतातील नैसर्गिक वातावरण यामुळे अर्जुन भोजने यांच्या शेतात अविस्मरणीय असा ग्रामीण मेळा भरला होता.

शेतातच लाकडांच्या अंगारावर ताज्या गव्हाच्या ओब्यांना सावकाश भाजून गरमागरम हुरडा तयार करण्यात आला. भाजलेल्या कणसांमधून अलगद काढलेला नरम, सुगंधी हुरडा उपस्थितांनी चटणी, दही, चिवडा, खमंग भजे आणि



पारंपरिक धपाट्यांसह मनसोक्त आस्वादला. ग्रामीण चवीचा आणि मातीतल्या संस्कृतीचा संगम अनुभवताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते.

या खास सोहळ्यात अर्जुन भोजने, बाबासाहेब भोजने, मानिक भोजने, संजय भोजने, शंकर भोजने, जालिंदर खवाटे, प्रमोद खवाटे, विलास जाधव, ओम भोजने, कपिल जाधव, मयुर नेमाने , धिरज कुंडकर यांच्यासह कुटुंबीय, मित्रपरिवार, लहान मुले-मुली व नातेवाईक उत्साहाने सहभागी झाले होते. शेतातील अंगाराची ऊब, गप्पागोष्टींची रंगत आणि आपुलकीचा स्नेहबंध यामुळे कार्यक्रमाला आगळावेगळा रंग चढला.

हिवाळ्यातील ग्रामीण परंपरेचे जतन करणारा हा उपक्रम असल्याची भावना व्यक्त केली. शहरातील धकाधकीच्या जीवनापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात साजरी झालेली ही हुरडा पार्टी केवळ मेजवानी नव्हे, तर एक भावनिक आणि सांस्कृतिक अनुभव ठरली.

ग्रामीण जीवनशैलीचा सुगंध दरवळवत, रंगलेली ही हुरडा पार्टी सर्वांच्या मनात गोड आठवण बनून राहिली.

# मठ पिंपळगाव येथील प्रा. रमेश गाढे यांना मातृशोक

अंबड/प्रतिनिधी

किनगाव (ता.अंबड) येथील जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक तसेच मराठवाडा शिक्षक संघाचे अंबड तालुकाध्यक्ष प्रा.रमेश लक्ष्मण गाढे यांच्या मातोश्री तथा मठ पिंपळगाव येथील ज्येष्ठ नागरिक लहानाबाई लक्ष्मण गाढे यांचे आज (ता.१) रविवारी सकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या.

लहानाबाई गाढे या अत्यंत कष्टाळू आणि शांत स्वभावाच्या म्हणून परिचित होत्या. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरात मोठी हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात सर्जेराव गाढे, बाबुराव गाढे, श्रीपत गाढे आणि प्रा.रमेश गाढे ही चार मुले, सुना, नातवंडे, नातसुना,पणतू असा मोठा परिवार आहे.

आज दुपारी ४ वाजता मठ पिंपळगाव येथील सार्वजनिक स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



यावेळी मठ पिंपळगाव व परिसरातील ग्रामस्थ, नातलग तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी उपसभापती किसनराव मोरे यांची शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुखपदी नियुक्ती

मंठा /प्रतिनिधी

तालुक्यातील राजकारणात महत्त्वाचा फेरबदल घडत माजी उपसभापती किसनराव मोरे यांची एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (शिंदे गट)च्या जालना उपजिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेसचे माजी उपजिल्हाध्यक्ष म्हणून कार्य केलेल्या मोरे यांनी सुमारे पंचवीस वर्षे कृषी उत्पन्न बाजार समिती व पंचायत समितीच्या माध्यमातून सक्रिय राजकारण केले आहे.

या नियुक्तीसाठी माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर, आमदार हिकमत उडान तसेच जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांनी पक्ष नेतृत्वाकडे आग्रही मागणी केली होती. त्यानुसार २६ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे राज्याचे मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते मोरे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी आमदार हिकमत उढाण, जिल्हाप्रमुख आसाराम बोराडे, प्रल्हादराव बोराडे, सुदर्शन सोळंके, तुळशीराम कुहिरे आदी मान्यवर उपस्थित होते.

किसनराव मोरे यांनी मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि पंचायत समितीच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर भक्कम राजकीय पाया निर्माण केला आहे. शेतकरी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवत त्यांनी तालुक्यात स्वतंत्र ओळख निर्माण केली. जिल्हा परिषद पातळीवरही त्यांनी सक्रिय भूमिका बजावली आहे.

काँग्रेसमधील जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर शिवसेनेत प्रवेश करून उपजिल्हाप्रमुखपदाची धुरा स्वीकारल्यामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. मागील विधानसभेनंतर सुरू असलेल्या राजकीय हालचालींच्या पार्श्वभूमीवर मोरे यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

या निर्णयामुळे शिवसेना (शिंदे गट)मध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती पक्ष संघटनासाठी



बळकटी देणारी ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

नवीन जबाबदारी स्वीकारताना मोरे यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानत संघटन वाढीसाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर ठामपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

## वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश; अंधश्रद्धा टाळण्याचे आवाहन

जालना /प्रतिनिधी

अंकुशराव टोपे महाविद्यालय येथे राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी थोर भारतीय शास्त्रज्ञ हि.व्ही.रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल, जागरूकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. दादासाहेब गजहंस होते तर उपप्राचार्य डॉ. संजय पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, कार्यालयीन अधीक्षक सुरेश चव्हाण, पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर तसेच विज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. बद्रीनाथ शिंदे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

डिजिटल युगात विज्ञानाचे भान आवश्यक

आपल्या मनोगतात उपप्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी विज्ञानाचे आधुनिक जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. कृषी क्षेत्रातील क्रांती मोबाईल क्रांती तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) च्या वापरामुळे देश झपाट्याने प्रगती करत असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र डिजिटल युगात विद्यार्थ्यांची अभ्यासातील एकाग्रता कमी होत असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आणि वेळेचे योग्य व्यवस्थापन करण्याचे




आवाहन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांनी विद्यार्थ्यांनी पूर्वग्रहदूषित विचारसरणी टाळून विवेकबुद्धीने निर्णय घ्यावेत, असे प्रतिपादन केले. अंधश्रद्धेला बळी न पडता वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ शिक्षण हाच देशाला महासत्ता बनविण्याचा महामंत्र आहे असे ठामपणे नमूद करत त्यांनी विज्ञाननिष्ठ, जागरूक आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रविकिरण भुतेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सचिन पांचाळ यांनी प्रभावीपणे केले तर आभार प्रदर्शन प्रा. कांचन मुळे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. तेजल उगले, डॉ. रामेश्वर बोराडे, प्रा. महेश डोईफोडे, प्रा. अजिंक्य शेळके, प्रा. केतन वाहूले, प्रा. मनोरमा पात्रे, डॉ. शकुंतला म्हस्के, डॉ. शिकवण्या वाडेकर, डॉ. सुजाता पाटील, प्रा. प्रिती गोरडे, प्रा. नीता गोरे आदी प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.

# नवसर्जनाची झेप: छत्रपती शिवाजी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलमध्ये 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा!

## विज्ञानाच्या प्रयोगातून विद्यार्थ्यांनी मांडली भविष्यातील भारताची संकल्पना; अध्यक्ष अभयकुमार काळुंके यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

परतूर (प्रतिनिधी तारेख शेख

विज्ञानातील नवनवीन प्रयोगांची मेजवानी आणि विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचा आविष्कार आज छत्रपती शिवाजी इंटरनॅशनल ड्रीम स्कूल येथे पाहायला मिळाला. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या भव्य विज्ञान प्रदर्शनाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक जिज्ञासा जागृत करणे आणि त्यांच्या प्रयोगशीलतेला व्यासपीठ मिळवून देणे, हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रप्रमुख बाबासाहेब तरवटे आणि शाळेचे अध्यक्ष अभयकुमार काळुंके यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी प्रदर्शनातील प्रत्येक स्टॉलला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या प्रयोगांची बारकाईने माहिती घेतली आणि त्यांच्या आत्मविश्वासाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी अतिशय कल्पकतेने विविध विषयांवर आधारित मॉडेल्स सादर केले होते, त्यामध्ये प्रामुख्याने: ऊर्जा बचत व सौरऊर्जा संकल्पना पर्यावरण संवर्धन व पाणी शुद्धीकरण प्रकल्प

अवकाश संशोधन आणि स्मार्ट सिटीची प्रतिकृती विज्ञानातील कठीण संकल्पनांचे थेट प्रयोग करण्यात आला तसेच या प्रसंगी मार्गदर्शन करताना शाळेचे अध्यक्ष अभयकुमार काळुंके म्हणाले की, विज्ञान म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील धडे नसून, ती प्रश्न विचारण्याची आणि समस्यांवर उपाय शोधण्याची एक जीवनशैली आहे. विद्यार्थ्यांनी



जिज्ञासू वृत्ती जोपासावी, तरच उद्याचा भारत अधिक सक्षम आणि आधुनिक बनेल. त्यांच्या या शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची नवी उमेद निर्माण केली. शाळेच्या सचिव सौ. मीनाक्षी काळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण प्रदर्शनाचे नेटके नियोजन करण्यात आले होते. शिक्षक वृंदाचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या सादरीकरण कौशल्याचे आणि नाविन्यपूर्ण दृष्टीकोनाचे दर्शन घडले.

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरात वैज्ञानिक वातावरण निर्माण झाले असून, पालकांनीही विद्यार्थ्यांच्या या प्रतिभेचे भरभरून कौतुक केले आहे.

# अंबड महसूल प्रशासनाची धडक पारदर्शक आणि लोकाभिमुख कारवाई

## छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अंतर्गत वंचितांना घरबसल्या न्याय



अंबड /प्रतिनिधी

शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने तळागाळातील गरजूंपर्यंत पोहोचावा या उद्देशाने अंबड महसूल प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान टप्पा १ अंतर्गत व्यापक आणि संवेदनशील शोध मोहीम सुरू केली आहे. अनेक वर्षे शासकीय दारात चकरा मारूनही लाभापासून वंचित राहिलेल्या दिव्यांग, मूकबधिर, परित्यक्त्या भूमिहीन आणि निराधार घटकांना आता घरबसल्या न्याय मिळू लागला आहे.

माननीय जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हादगल आणि उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली अंबडचे तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी विजय चव्हाण यांच्या नेतृत्वात ही मोहीम प्रभावीपणे राबवली जात आहे.तहसीलदार विजय चव्हाण यांनी प्रत्यक्ष लक्ष घालून प्रशासनाला लोकाभिमुख व संवेदनशील चेहरा दिला आहे.

तहसील कार्यालयाच्या चकरा थांबल्या घरबसल्या अर्ज प्रक्रिया

यापूर्वी गोरगरीब नागरिकांना कागदपत्रांसाठी तहसील कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागत होते.आर्थिक, शारीरिक व सामाजिक अडचणींमुळे अनेकजण लाभापासून दूर राहत होते.मात्र आता पात्र लाभार्थींना फक्त आधारकार्ड व आवश्यक कागदपत्रे गावचे तलाठी किंवा नवनियुक्त पोलीस पाटील यांच्याकडे सादर करायची आहेत.अर्ज कार्यालयापर्यंत पोहोचवून पुढील कार्यवाही प्रशासनाकडून केली जात आहे. त्यामुळे नागरिकांची धावपळ आणि गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

अपात्रांवर कारवाई पात्रांना प्राधान्य

विविध योजनांचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांची सखोल छाननी सुरू असून अपात्र आढळणाऱ्यांची नावे तत्काळ वगळली जात आहेत.त्या जागी खऱ्या आणि पात्र वंचित लाभार्थ्यांचा समावेश केला जात आहे. शासकीय योजना या खऱ्या गरजूंसाठीच आहेत या स्पष्ट भूमिकेतून प्रशासन पारदर्शक पद्धतीने काम करत आहे.

तलाठी व पोलीस पाटील यांची गावोगावी धडक

नवनियुक्त पोलीस पाटील आणि तलाठी यांना गाव पातळीवर विशेष जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांनी प्रत्यक्ष गावात फिरून माहितीअभावी लाभापासून दूर असलेल्या दिव्यांग, निराधार, परित्यक्त्या महिलांचा शोध घ्यायचा आहे. त्यामुळे प्रशासन स्वतः नागरिकांच्या दारात पोहोचत आहे.

विश्वासाचे वातावरण निर्माण

या मोहिमेमुळे तहसील म्हणजे अडथळा ही भीती दूर होत असून तहसील म्हणजे आधार अशी भावना नागरिकांत निर्माण झाली आहे. प्रशासनाने अपात्रांना वगळून पात्रांना न्याय देण्याची भूमिका घेतल्याने तालुक्यात समाधान व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांनी लाभासाठी थेट तहसील कार्यालयात न येता आपल्या गावच्या तलाठी व पोलीस पाटील यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन अंबड महसूल प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अंबड तालुक्यातील ही धडक पारदर्शक आणि लोकाभिमुख मोहीम शासनाच्या योजनांना खऱ्या अर्थाने जनतेच्या दारी पोहोचवणारी ठरत आहे.




# भराडखेडा येथे शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी योगेश गावंदे तर उपाध्यक्ष भारती सगट

जाफराबाद / प्रतिनिधी हरी भालके

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भराडखेडा येथे शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक उत्साहात पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी योगेश बबनराव गावंदे तर उपाध्यक्षपदी भारती सुनील सगट यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवड जाहीर होताच उपस्थित पालक व ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन केले. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भराडखेडाचे मुख्याध्यापक . गजानन उखळकर, सहशिक्षिका अनिता नवले , तसेच शाळेचे सर्व पालकवर्ग व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश गावंदे यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व शाळेतील सोयी-सुविधा वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.या निवडीमुळे शाळेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाला अधिक गती मिळणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# आ.सुरेश धस यांना सोशल मीडियावरून जीवे मारण्याची धमकी

कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा लोकप्रिय लोकनेते आ. सुरेश धस यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह व जीवे मारण्याची उघड धमकी देणारी पोस्ट व्हायरल झाल्याने मतदारसंघात तीव्र खळबळ उडाली आहे. या प्रकरणी आ. धस यांचे समर्थक व कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशन आष्टी, अंभोरा आणि कडा येथे लेखी तक्रार दाखल करून संबंधित व्यक्तीवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

समर्थकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी फेसबुक या सामाजिक माध्यमावरील एका अकाउंटवरून आ. धस यांच्याविरोधात भडकावू व धमकीच्या स्वरूपाचा मजकूर पोस्ट करण्यात आला. संबंधित पोस्टमध्ये आमदारांविषयी उघड इशारा देण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. सदर पोस्टचा आशय हा थेट जीवे मारण्याची धमकी देणारा असून, त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तक्रारदारांनी पुढे म्हटले आहे की, अशा प्रकारच्या बेजबाबदार व चिथावणीखोर वक्तव्यांमुळे समर्थकांमध्ये संतापाची भावना निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींविरुद्ध उघड धमक्या देणे ही अत्यंत गंभीर व दंडनीय बाब असून, सामाजिक माध्यमांचा गैरवापर करून सार्वजनिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.




कायदेशीर दृष्ट्या पाहता, भारतीय दंड संहिता तसेच सार्वजनिक शांतता भंग करण्यास प्रवृत्त करणारी विधाने अंतर्गत कारवाई होऊ शकते. तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम मधील संबंधित तरतुदींनुसारही गुन्हा नोंदविण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित व्यक्तीविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली आहे.

दरम्यान, तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने संबंधित पोस्टची तांत्रिक पडताळणी सुरू केली असून, पोस्ट करणाऱ्या व्यक्तीची ओळख निश्चित करण्यासाठी सायबर शाखेची मदत घेतली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली. पुरावे संकलित करून कायदेशीर प्रक्रियेप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले. या घटनेच्या निषेधार्थ आष्टी, अंभोरा व कडा येथे आ. धस यांचे शेकडो समर्थक उपस्थित राहून संताप व्यक्त केला. लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेबाबत प्रशासनाने अधिक दक्षता घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सदर प्रकरणामुळे मतदारसंघात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिस प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

# कृषी क्षेत्रात एआय फॉर ॲग्री २०२६ ची अंमलबजावणी व बिबट्या प्रश्नावर ठोस उपाययोजना करा

## आ. सुरेश धस यांची विधानसभेत मागणी

आष्टी - (प्रतिनिधी)

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ दरम्यान सभागृहात बोलताना आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय - आर्टिफिशियल इंटेलिजन्स) तंत्रज्ञानाचा प्रभावी व व्यापक वापर करण्याची ठाम मागणी केली. राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेती अधिक शाश्वत व आधुनिक बनवणे आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत सक्षम स्थान मिळवून देण्यासाठी एआय फॉर ॲग्री २०२६ ही संकल्पना तातडीने आणि परिणामकारक पद्धतीने राबविणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

सभागृहात बोलताना आमदार धस म्हणाले की, हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते उत्पादन खर्च आणि बाजारभावातील चढ-उतार या पार्श्वभूमीवर पारंपरिक शेती पद्धतींसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे अत्यावश्यक झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हवामान अंदाजावर आधारित पेरणी सल्ला, कीड व रोगांचे त्वरित निदान, माती परीक्षणावर आधारित अचूक खत शिफारस, स्मार्ट सिंचन प्रणालीद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर तसेच बाजारभावाचा अंदाज शेतकऱ्यांना उपलब्ध करून देता येऊ शकतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यात एआय आधारित कृषी मार्गदर्शन केंद्र स्थापन करावे, शेतकऱ्यांना अनुदानित दरात माती सेन्सर व स्मार्ट सिंचन प्रणाली उपलब्ध करून द्यावी, कृषी विद्यापीठांमध्ये एआय संशोधनासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करावेत, ग्रामीण भागात सक्षम व जलद इंटरनेट सुविधा निर्माण करावी आणि कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना एआय विषयक विशेष प्रशिक्षण द्यावे, अशा ठोस मागण्या त्यांनी सरकारकडे मांडल्या.

दरम्यान, आमदार धस यांनी पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि बीड जिल्ह्यांमध्ये वाढत चाललेल्या बिबट्या समस्येकडे सभागृहाचे लक्ष वेधले. ग्रामीण व उपनगरांमध्ये बिबट्यांच्या हालचाली वाढत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीच्या आणि परिणामकारक उपाययोजना राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. खेड-मंचर येथील रेस्क्यू सेंटरचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगत त्यांनी अशा सुविधांचा विस्तार करण्याची गरज व्यक्त केली.

गावपातळीवर बिबट्याबाबत जनजागृती मोहीम राबवावी, एलईडी स्क्रीनद्वारे सूचना व मार्गदर्शक माहिती उपलब्ध करून द्यावी, संवेदनशील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच बिबट्यांच्या हालचालींबाबत पूर्वसूचना देणारी आधुनिक यंत्रणा उभारावी, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय बिबट्या व अन्य वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू



झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या शासन निर्णयात स्पष्टता आणून बाधित कुटुंबांचे योग्य पुनर्वसन करावे, अशीही त्यांनी आग्रही भूमिका मांडली.

शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि ग्रामीण भागातील नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. आधुनिक तंत्रज्ञान व प्रभावी प्रशासन यांच्या समन्वयातूनच महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो, असे प्रतिपादन आमदार सुरेश आण्णा धस यांनी आपल्या भाषणात केले.

# एन.एम.एम.एस.परीक्षेत ११२ विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश

## पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात आज भव्य सत्कार समारंभ

आष्टी - (प्रतिनिधी) शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आष्टी येथे एन.एम.एम.एस.परीक्षेत तब्बल ११२ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून विद्यालयाचा लौकिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी आज सोमवार, दि. ०२ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वा. विद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थी व पालक भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

यशाचा उत्तम मार्ग म्हणजे ध्येय, जिद्द, चिकाटी, सातत्य व कठोर परिश्रम या मूल्यांचा अंगीकार करून विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एन.एम.एम.एस. परीक्षेत उल्लेखनीय भरारी घेतली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विद्यालयात सातत्याने गुणवत्तापूर्ण अध्यापन, विशेष मार्गदर्शन वर्ग, सराव परीक्षा आणि शिक्षकांचे व्यक्तिगत मार्गदर्शन दिले जाते. त्याचाच परिपाक म्हणून यंदा ११२ विद्यार्थ्यांनी यश मिळवून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.

या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब हे उपस्थित राहणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून मा. डॉ. अजयदादा धोंडे (सहसचिव, शे.शि.प्र. मंडळ आष्टी तसेच राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर) उपस्थित राहणार आहेत. यावेळी गटशिक्षणाधिकारी मा. श्री. मोहन काकडे, शिक्षणविस्तार अधिकारी मा. श्रीमती सीमा काळे, केंद्रप्रमुख मा. श्री.



त्रिंबकराव दिंडे तसेच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी येथील सर्व प्रशासकीय अधिकारी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य सुरेश बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या समारंभाच्या तयारीत पुढाकार घेतला आहे. कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार असून त्यांच्या पालकांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे. विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश प्रेरणादायी ठरणार आहे. कार्यक्रमास पालक, माजी विद्यार्थी, शिक्षणप्रेमी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वि.दा.सावरकर विद्यालय चिखली येथील विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी

## एन.एम.एम.एस.परीक्षेत घवघवीत यश

आष्टी - (राजेंद्र लाड) श्रीराम सेवाभावी संस्था कोयाळ संचलित वि. दा. सावरकर माध्यमिक विद्यालय, चिखली (ता. आष्टी, जि. बीड) येथील विद्यार्थ्यांनी एन.एम.एम.एस. २०२५-२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले असून परिसरात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये मांडगे शिवानी अशोक, टकले अंकिता राकेश, घोलप प्राची प्रवीण, कोकणे रुपाली गोरक्षनाथ, आवारे शंभु विलास, मांडगे अर्पिता राजू, कोकणे सार्थक सुरेश, शिंदे सृष्टी चंद्रशेखर व चखाले ओंकार हौसराव या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या सर्वांनी आपल्या जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमाच्या जोरावर एन.एम.एम.एस. सारख्या स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळवून विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन तसेच पालकांचे सहकार्य मोलाचे ठरले. शाळेत नियमितपणे घेण्यात आलेले अतिरिक्त तास, सराव परीक्षा, वैयक्तिक मार्गदर्शन आणि अभ्यासाची शिस्तबद्ध पद्धत यामुळे विद्यार्थ्यांना या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करता आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मर्यादित साधनसामग्रीतून मिळवलेले हे यश प्रेरणादायी ठरत आहे.

विद्यालयाच्या या यशाबद्दल माजी आ. साहेबराव दरेकर नाना, माजी शिक्षण सभापती उद्धव बापू दरेकर तसेच संस्थेचे पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच चिखली, हनुमंतगाव व खानापूर येथील ग्रामस्थांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. एन.एम.एम.एस. परीक्षेत मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार असून विद्यालयाची गुणवत्ता व शैक्षणिक बांधिलकी अधोरेखित करणारे आहे.

# सहा वर्षीय उजेर तांबोळीचा पहिला रोजा पूर्ण

आष्टी - (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील कडा येथील रहिवासी असलेल्या सहा वर्षीय उजेर हाकीम तांबोळी याने अत्यंत लहान वयात आपला पहिला रोजा पूर्ण करून परिसरात कौतुकास्पद आदर्श निर्माण केला आहे. कडक उन्हाळ्यातही त्याने जिद्द, संयम आणि दृढ श्रद्धेच्या बळावर दिवसभर उपवास पाळत अल्लाहची इबादत केली.

रमजान महिन्यात मुस्लिम बांधवांकडून रोजा पाळण्याची परंपरा श्रद्धेने जपली जाते. या पार्श्वभूमीवर एवढ्या लहान वयात उजेरने कोणतीही तक्रार न करता, न थकता आणि न डगमगता आपला पहिला रोजा पूर्ण केला. दिवसभर त्याने नमाज, प्रार्थना आणि धार्मिक वाचन यामध्ये वेळ व्यतीत केला. त्याच्या या जिद्दीमुळे कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांनी त्याचे मनापासून कौतुक केले.

उजेरचे पालक हाकीम तांबोळी यांनी सांगितले की, लहानपणापासूनच उजेरला धार्मिक संस्कारांची आवड आहे. शिस्तबद्ध वर्तन, मोठ्यांचा आदर आणि नियमित प्रार्थना याकडे त्याचा कल असल्याने त्याने स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. त्याच्या या नेक कृतीमुळे कुटुंबीयांना अभिमान



वाटत असून, त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

उजेरचे हे पाऊल आजच्या पिढीतील मुलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. योग्य मार्गदर्शन, चांगले संस्कार आणि कुटुंबीयांचा पाठिंबा मिळाल्यास मुले लहान वयातही संयम, आत्मसंयम आणि श्रद्धा यांसारखी मूल्ये आत्मसात करू शकतात, हे उजेरच्या कृतीतून स्पष्ट झाले आहे.

# अखेर कॉंग्रेस च्या मागणीला यश हडको येथे नियमित पोलीस बंदोबस्त पॉईंट सुरु




नवीन नांदेड ।प्रतिनिधी

हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नियमित पोलीस बंदोबस्त पॉईंट द्यावा अशी मागणी, खा. रवींद्र चव्हाण व कॉंग्रेस महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शना खाली सिडको वाघाळा ब्लॉक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी शिष्टमंडळासह शनिवार दि २८ फेबुवारी रोजी केली होती दरम्यान मागणीला जलद प्रतिसाद देत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी रविवार दि. ०१ मार्च पासून हडको बस्टॉप येथे नियमितपणे पोलीस बंदोबस्त सुरु केला आहे. रविवारी एक पोलीस उपनिरीक्षक, एक पोलीस व तीन होमगार्ड आदींचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या निर्णयाचे सिडको कॉंग्रेसच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे.

हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक हा पाच शाळा, चार मंगल कार्यालय, आठ दहा प्रार्थना स्थळे, एक वैद्यकीय महाविद्यालय, हडको मुख्य बाजार पेठ, रविवार आठवडी बाजार व छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक असलेला मध्यवर्ती भूभाग आहे. या भागातील असुरक्षितता दिवसेंदिवस वाढत असल्याने सदर चौकात नियमित पोलीस बंदोबस्त पॉईंट द्यावा अशी मागणी सिडको कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या वतीने शनिवार (ता.२८) रोजी करण्यात आली होती. यावेळी, महिला कॉंग्रेस जिल्हाध्यक्षा आरती डोईबळे, कॉंग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी प्रल्हाद गव्हाणे, लतिफ शेख, मोईन शेख लाठकर आदीसह इतर कॉंग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. सदर मागणीला जलद प्रतिसाद देत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी रविवार दिनांक ०१ मार्च पासून नियमितपणे पोलीस बंदोबस्त सुरु केला आहे. पहिला दिवशी एक पोलीस उपनिरीक्षक, एक पोलीस, तीन होमगार्ड आदींचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या निर्णयाचे सिडको कॉंग्रेसच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे.

# एज्युव्हीजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन



अर्धापूर (प्रतिनिधी)शहरातील एज्युव्हिजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये २८ फेब्रुवारी २०२६ रोजी जागतिक विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवा निवृत्त शिक्षक पांडुरंग बोबडे,प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सखाराम क्षीरसागर, अध्यक्ष गुणवंत विरकर,साई कम्प्युटरचे संचालक नागेश खरसकर यांची उपस्थिती होती. आजच्या विज्ञान प्रदर्शनाचे विशेष म्हणजे शाळेतील एकूण ११० विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपल्या मधील असणाऱ्या कलागुणांचे सादरीकरण केले आहे. स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना टिकवण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी शाळेने भव्य अशा विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते.

शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शनाची स्पर्धा ही तीन गटांमध्ये घेण्यात आलेली असून यामध्ये प्रथम क्रमांक कु.मनस्वी कवडे, कु. सिद्धी गोमासे कु.रिया अंधारे तर द्वितीय क्रमांक कु.समीक्षा देशमुख, कु.दृष्टी घोडेकर, कु.आरोही पवार आणि तिसऱ्या क्रमांक कु.आराध्या कोपरे, कु.स्पर्शिका खरसकर, शिवांश पतंगे यांनी मिळवला.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शिक्षिका

रोहिणी शिंदे,कोमल डांगे,स्वाती कवडे,स्वाती पांचाळ, शिवराणी पत्रे, किरण क्षीरसागर, अल्का धुमाळ, ममता हट्टेकर,बी विजयकृष्णा, मनीषा सिंग, शांतून सिंग, दत्ता उपरे, आशुतोष पुरी सेविका अर्चना रसवंते,कविता गाडेकर,विजय पवार यांनी परिश्रम घेतले

कार्यक्रम यशस्वीरित्या घडवून आणल्याबद्दल शाळेचे संचालक प्रवीण रावते तसेच प्राचार्य प्रिया रावते संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती रेखाताई रावते संस्थेचे उपाध्यक्ष अभिषेक गुरखेल यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले

# मराठा भूषण पुरस्कार भास्कर हंबर्डे यांना मिळाल्या बद्दल जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी यांच्या वतीने सत्कार सन्मान



नांदेड ।प्रतिनिधी

पिएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी यांच्या वतीने छावा श्रमिक संघटना मराठवाडा अध्यक्ष तथा जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष भास्कर हंबर्डे यांना शिवजन्मोत्सव निमित्ताने नांदेड येथे मराठा भुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांना दि २८ फेब्रुवारी रोजी मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शाल श्रीफळ देऊन मुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे वेळो वेळी अनेक कार्यक्रम व स्पर्धा परिक्षा यासह अनेक कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या सामाजिक , शैक्षणिक चळवळीतील कार्याची दखल घेत भास्कर हंबर्डे यांना शिवजन्मोत्सव समिती नांदेड यांच्या वतीने मराठा भुषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल व शाळेतील शिक्षीका अनिता ऊध्दंत यांना दैनिक लोकमत तर्फे पुरस्कार मिळाल्याबद्दल शाल श्रीफळ देऊन पिएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे दि २८ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, शिक्षण विस्तार अधिकारी, बालासाहेब कच्छवे,सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे,शंकर हंबर्डे, सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिक हंबर्डे, शिलानंद सौनकांबळे, मुख्याध्यापक उज्ज्वलाताई जाधव , पत्रकार रमेश ठाकूर यांच्या उपस्थितीत सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# मयूर कदम यांचा 'रासायनिक शेती' विषयावर उल्लेखनीय प्रबंध

नांदेड ।प्रतिनिधी

महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर येथील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता सहावीचा विद्यार्थी मयूर आनंद कदम याची डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा मध्ये लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेत यश मिळवत पुढील प्रबंध व मौखिक परीक्षेसाठी निवड झाली आहे.

मयूरने रासायनिक शेती : निसर्गासाठी एक हळुवार धोका या विषयावर प्रकल्प सादर केला आहे. प्रकल्पाच्या पहिल्या सत्रात त्याने महाराष्ट्र शासन कृषी विभाग अंतर्गत मृद सर्वेक्षण व मृद चाचणी, जिल्हा नांदेड येथे भेट देऊन जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी बालाप्रसाद बंदेल , श्यारी गजानन पडलवार, सहायक कृषी अधिकारी च्यासोबत चर्चा केली. जमिनीचा जिवंतपणा जपण्यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच मृद प्रयोगशाळेतील माती परीक्षणाची माहिती त्याने घेतली.

दुसऱ्या सत्रात मयूरने कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी येथे भेट देऊन डेमो प्लॉट व विविध प्रात्यक्षिके पाहिली. तेथील शास्त्रज्ञांशी संवाद साधून रासायनिक शेती व सेंद्रिय शेतीविषयी सविस्तर माहिती मिळवली.

तिसऱ्या सत्रात कृषी महाविद्यालय, नायगाव (खै.) येथे उपप्राचार्य नागेश घुबे, प्रा. भद्रे सर, देशमुख सर, जंगीलवाड मॅडम आदींसोबत चर्चा केली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून रासायनिक व सेंद्रिय शेती यामध्ये समतोल साधण्याच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन घेतले.

चौथ्या सत्रात तुप्पा शिवारातील शेतकरी कचरू कदम, यशवंत कदम, सौ. पदमीनबाई, सौ. भारतबाई, सौ. उमाबाई आदींच्या शेतावर जाऊन रासायनिक शेती : निसर्गासाठी एक हळुवार धोका या विषयावर जनजागृती केली.

या प्रकल्पासाठी दत्तात्रय नारे सर व केशव पाटील सर यांनी माहिती संकलनात विशेष सहकार्य केले. मयूरच्या या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता वाढण्यास मदत होत असून त्याच्या पुढील प्रबंध व मौखिक परीक्षेसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# १३ वर्षांपासून किनवट रेल्वे स्थानकावर अज्ञात युवक; 'कृष्णा एक्सप्रेस'ला ओळख मिळणार कधी?

किनवट ।प्रतिनिधी

किनवट रेल्वे स्थानकावर गेल्या तेरा वर्षांपासून एक अज्ञात मुलगा वास्तव्य करत आहे. त्याला ना नाव, ना गाव, ना आई-वडील, ना जात-धर्म अशी कोणतीही ओळख नाही. स्थानकावर नियमित येणाऱ्या प्रवाशांनी व स्थानिक नागरिकांनी त्याला आदिलाबाद ते तिरुपती दरम्यान धावणाऱ्या कृष्णा एक्सप्रेस या गाडीचे नाव दिले. तेव्हापासून तो 'कृष्णा' या नावाने परिचित आहे. मात्र या कृष्णाची कायदेशीर ओळख निर्माण करण्यासाठी आजवर कोणतीही शासकीय यंत्रणा पुढे आलेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर असल्याची भावना परिसरातील नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

सुमारे तेरा वर्षांपूर्वी वयाच्या तीन ते चार वर्षांत हा मुलगा किनवट रेल्वे स्थानकावर आढळला. तो कोणाचा, कुठून आला, याची कोणालाही माहिती नव्हती. त्याला स्वतःलाही आपले नाव, आई-वडिलांचे नाव वा मूळ गाव यापैकी काहीही सांगता येत नव्हते. त्यामुळे स्थानकावरील नागरिकांनी त्याचा सांभाळ केला आणि समोर उभ्या असलेल्या कृष्णा एक्सप्रेस गाडीच्या नावावरून त्याला 'कृष्णा' असे संबोधू लागले. आज तोच कृष्णा अंदाजे पंधरा ते सतरा वर्षांचा तरुण झाला आहे.

ज्या वयात मुले शाळेत जाऊन शिक्षण घेतात, घरच्यांच्या मायेत वाढतात, त्याच वयात कृष्णाने स्थानकावरील भिकाऱ्यांच्या व अपंग व्यक्तींच्या सहवासात दिवस काढले. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे तिन्ही ऋतू त्याने उघड्यावर अनुभवले. आई-वडिलांचे प्रेम, शालेय शिक्षण, पोषण आहार व आरोग्य सेवा या सर्व मूलभूत गोष्टींपासून तो कायमचा वंचित राहिला. परिसरातील नागरिक त्याला चांगल्या प्रकारे ओळखत असले, तरी त्याची अधिकृत ओळख निर्माण करण्याचे काम आजवर कोणी केले नाही.

कृष्णा आता पौगंडावस्थेत आल्याने त्याला पुढील आयुष्य जगण्यासाठी आधार कार्ड, जन्म दाखला, मतदान ओळखपत्र व शैक्षणिक कागदपत्रे यांची नितांत गरज आहे. मात्र आई-वडील, जात, धर्म व जन्मतारीख यापैकी कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने ही कागदपत्रे मिळवणे अत्यंत कठीण बनले आहे. परिणामी शासकीय योजनांचा लाभ तर दूरच, त्यांची साधी माहितीही त्याला मिळालेली नाही. कृष्णाची ही परिस्थिती म्हणजे शासकीय यंत्रणांच्या उदासीनतेचे ठळक उदाहरण आहे. शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण, बाल संरक्षण कायदे, बाल कल्याण समिती व बाल आयोग या यंत्रणा कार्यरत असताना एक मुलगा तब्बल तेरा वर्षे रेल्वे स्थानकावर उपेक्षित राहतो, हे या सर्व यंत्रणांच्या अपयशाचे निदर्शक आहे. या प्रकरणाची दखल घेत कॉंग्रेस पक्षाचे ओबीसी विभाग जिल्हा उपाध्यक्ष वसंत राठोड यांनी कृष्णाला कायदेशीर मार्गाने कागदपत्रे मिळवून देण्यासाठी उपलब्ध पर्यायांबाबत संबंधित यंत्रणांकडे विचारणा केली आहे.

शासनाने तातडीने पुढाकार घेऊन कृष्णाला कायदेशीर ओळख मिळवून द्यावी, जेणेकरून त्याला एक सामान्य नागरिक म्हणून जगता येईल, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत. या 'कृष्णा एक्सप्रेस'ची जीवनगाडी यापुढे तरी योग्य दिशेने धावावी, एवढीच त्यांची अपेक्षा आहे.



# कै.डॉ.शंकरराव चव्हाण यांचे कार्य अजरामर – निळकंठ मदने



अर्धापूर(प्रतिनिंधी): राजकीय व सामाजीक जीवनात डॉ.शंकरराव चव्हाण यांनी काम करतांना राज्यातील शेतकरी व शेतमजुरांच्या आयुष्यांचा विचार करून राजकीय विरोध झुगारून राज्यात असंख्य धरणांचे निर्माण करून शेतकरी,शेतमजुर,कामगार व व्यापारी या सर्वांचे वर्षानुवर्षे कल्याण केले,त्यामुळे त्यांचे कार्य अजरामर राहीन असे प्रतिपादन कृषी ऊत्पन्न बाजार समितीचे संचालक निळकंठराव मदने यांनी मोफत तपासणी व शिबीर प्रसंगी केले.कै.डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमीत्य पार्डी(म) येथे शुक्रवारी मोफत आरोग्य तपासणीत ७० वर्षाच्यासाठी कार्ड व प्रधानमंत्री जनआरोग्य कार्ड योजना सर्व महत्वाच्या विषयाच्या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृऊबाचे संचालक निळकंठराव मदने हे होते तर प्रमुख पाहुणे तालुका आरोग्य अधीकारी श्रीकांत देशाई,डॉ.एस पी गोखले,डॉ.पल्लवी फिसके, ग्रामविकास अधीकारी शिवकुमार देशमुख,पी.एल. मदने यांची उपस्थीती होती.यावेळी मोफत आरोग्य तपासणी करून,महिलांची रक्त तपासणी करून आयुष्यमान कार्डाचे वितरण व गोल्ड कार्डासाठी नोंदणी करण्यात आली.यावेळी निळकंठ मदने यांनी कै.डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तर अधिकाऱ्यांनी शासकिय योजना जनसामान्यापर्यत पोहचविण्याठी उपाययोजना सांगीतल्या.यावेळी भाऊराव मदने,पुंजाराम मदने,कल्याणराव हापगुंडे,माधवराव कवडे,सुनिल मदने,बाजीराव मदने,राजकुमार मदने,प्रसाद हापगुंडे,रूस्तुमसाब,एस एस यादव,एस एस मांजरमकर,श्रीमती एस जी खरटमोल,एल एस वाखरडे,श्रीमती अनिता चव्हाण,गुणाबाई कांबळे,सरस्वतीबाई कांबळे,माया कांबळे,मंदीबाई नरोटे,स्वाती कांबळे,लता दाढेल,निकीता मोहन,रोमा मदने,अंबिका हापगुंडे,शेख आफ्रीन,सारीका मदने,शिवशंकर दहिभाते,राम इबितवार,शेख गुलाब,नवनाथ मरकुंदे,बालाजी मरकुंदे,अवधूत वाघमोडे,दिपक कांबळे,रमेश कांबळे यांची उपस्थीती होती.



# प्रा. डॉ. रामप्रसाद तौर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

किनवट ।प्रतिनिधी

विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र यांच्या वतीने नांदेड येथील सायन्स कॉलेज मैदानावरील राजा ढाले साहित्य नगरी येथे आयोजित २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात (दि.२८) रोजी किनवट येथील प्रा. डॉ. रामप्रसाद तौर यांना विद्रोही जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात दीर्घकाळ केलेल्या कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. प्रा. तौर हे १९८७ पासून किनवट येथील बळीराम पाटील महाविद्यालयात अध्यापन करीत असून बंजारा व आदिवासीबहुल या दुर्गम भागात सत्यशोधक विचारांचा प्रसार आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन हे त्यांचे कार्य सुरू आहे. मराठी साहित्य समीक्षा हेही त्यांच्या कार्याचे एक महत्त्वाचे अंग आहे. स्वागताध्यक्ष राहुल एस. एम. प्रधान यांच्या हस्ते व राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व मानपत्र असे होते. हे संमेलन दि. २७ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आले असून यात साहित्यिक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# अरुण भैय्या निकाळजे,यशवंत खंडागळे,दीपक निकाळजे,शशिकांत निकाळजे,परिवंत गायकवाड यांच्याकडून पोलीस निरीक्षकांना निवेदन

## आंबेडकर चौक येथे रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

**आष्टी – (प्रतिनिधी)**

**आष्टी शहरातील आंबेडकर चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्याबाबतचे निवेदन दि. ०१ मार्च २०२६ रोजी आष्टी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना सादर करण्यात आले आहे. संबंधित निवेदनात काही व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून, मागणी मान्य न झाल्यास दि. ०३ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता आंबेडकर चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.**

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आ. मा. सुरेश (आण्णा) धस तसेच मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात सोशल मीडियावर आक्षेपार्ह व धमकीजनक पोस्ट प्रसारित करणाऱ्या गोविंद फड याच्याविरोधात गुन्हा दाखल करून तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी. समाजात तणाव निर्माण होऊ नये यासाठी पोलिस प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन समस्त आंबेडकरी संघटना, आष्टी (ता. आष्टी) यांच्या वतीने देण्यात आले असून, निवेदनावर अरुण भैय्या निकाळजे, यशवंत खंडागळे, दीपक निकाळजे, शशिकांत निकाळजे, परिवंत गायकवाड यांच्या सह्या असून त्यांनी निवेदनाद्वारे आंदोलनाची पूर्वसूचना देलेली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, पोलिस प्रशासनाकडून निवेदनाची दखल घेण्यात आली असून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती मिळाली आहे.